शुक्रवार, २० मे २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३०२
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## काँग्रेस नेते सुनील जाखड भाजपमध्ये दाखल



**चंदीगढ :** पंजाब काँग्रेसचे माजी प्रमुख सुनील जाखड यांनी गुरुवारी (दि. १९) दिल्लीत पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यांनी काही दिवसांपूर्वीच काँग्रेसला रामराम ठोकला होता. ते पंजाबमधील काँग्रेसचे अध्यक्ष होते. या वेळी नड्डा म्हणाले की, मी सुनील जाखड यांचे भारतीय जनता पक्षात स्वागत करतो. ते एक अनुभवी राजकीय नेते आहेत, ज्यांनी त्यांच्या राजकीय कारकिर्दीत स्वतःचे नाव कमावले. पंजाबमध्ये भारतीय जनता पक्ष मजबूत करण्यात त्यांचा मोठा वाटा असेल याची मला खात्री आहे. काँग्रेसला उतरती कळा लागली असतानाच सुनील जाखड यांनी काही दिवसांपूर्वीच सोशल मीडियावर लाईव्ह येत काँग्रेस पक्षाला रामराम केला होता.

## अंतरंग

गाडी विकण्याच्या बहाण्याने खारघरमध्ये तरुणाची फसवणूक/३
गिर्यारोहकांसाठी खोपोलीत ड्रोन वापराचे प्रशिक्षण/५
नवी मुंबई पालिका क्रीडा संघाचे कबड्डी स्पर्धेत यश/८

## विमानतळ प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण होईपर्यंत

# भूमिपुत्रांचा संघर्ष सुरूच राहणार

### कृती समिती अध्यक्ष दशरथ पाटील यांचा इशारा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

लोकनेते स्व. दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीची २९ गाव संवाद बैठक बुधवारी (दि. १८) झाली. या बैठकीत २४ जून या 'दिबां'च्या पुण्यतिथीनिमित्त पुन्हा एकदा शक्तीप्रदर्शन आंदोलन होणार असल्याचे उपस्थित नेत्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे जोपर्यंत नवी मुंबई विमानतळाला दि. बां. पाटलांचे नाव मिळेपर्यंत भूमिपुत्रांचा संघर्ष सुरूच राहिल, असा इशाराच सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी दिला.

एखाद्या पक्षाला बीकेसीवर सभेला परवानगी मिळते, मग आम्हाला सभेसाठी सिडको भवनसमोर परवानगी का देत नाही? असा सवाल करीत दशरथ पाटील यांनी केला. मी 'दिबां'चा पाठीराखा आहे. प्रसंगी उपनेते पदाचा राजीनामा देईन, पण नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चे नाव मिळत नाही तोपर्यंत संघर्ष करीत राहिन, असे त्यांनी सांगितले.





आमदार गणेश नाईक यांनी, नवी मुंबईतील ग्रामस्थ जमिनीचे मालक आहेत त्यांनी गावकमिटीच्या गावनिहाय गठण समित्या कराव्यात. त्याचप्रमाणे शहरातील सर्वच नागरी नोड आणि झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या रहिवासी व जागा मालकी हक्कासाठी एकत्रित राहावे जेणेकरून कुणीही भूमीपुत्र आणि रहिवासी नागरिक भाडेकरु होणार नाही. नवी मुंबई विमानतळाला दि. बां. चे नाव द्यावेच लागेल. नामांतरासाठी वेळप्रसंगी रस्त्यावर नागरिकांच्या सोबत उतरणार, असे सांगितले.

मच्छिमारांचे नेते विजय वरळीकर यांनी विमानतळ नामकरणाला पाठिंबा दिला. माजी महापौर सुधाकर सोनवणे यांनी दि. बां. च्या आंदोलनात सहभागी होण्याचे भाग्य मला लाभले, असे सांगितले. विमानतळ आंदोलनात मी व आमचे समाज बांधव पूर्णपणे सहभागी असल्याचा जाहीर पाठिंबा दिला.

या बैठकीसाठी स्व. दि. बां. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे कार्याध्यक्ष व भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष व कृती समितीचे सदस्य दशरथ भगत, डॉ. राजेश पाटील, ओबीसी नेते राजाराम पाटील, मनोहर पाटील, दिपक पाटील, कॉ. भूषण पाटील, जे. डी. तांडेल, माजी नगरसेविका फशीबाई भगत, वैजयंती भगत, शैलेश घाग, अॅड. शिल्पा पाटील, विनोद म्हात्रे, उत्तम म्हात्रे आदी उपस्थित होते. २४ जूनचे आंदोलन हे पुनश्च एकदा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बां. पाटील यांचे नाव देण्यासाठी सरकारला इशारा देणारे असणार आहे. एक लाखांहून अधिक आगरी, सागरी व शहरातील भूमिपुत्र २४ जून रोजी एकजूट दाखवणार आहेत, असेही बैठकीत सांगण्यात आले.

### २४ जूनच्या आंदोलनात सहभागी व्हा –आमदार प्रशांत ठाकूर

*नामकरण व भूमिपुत्रांच्या प्रलंबित मागण्यांबाबत सर्वांनी एकत्र या, अन्यथा 'असुनी नाथ, मी अनाथ' अशी गत होईल. आपल्या भावी पिढीच्या अस्मितेसाठी सर्वांनी एकसंघ होऊन पुढील महिन्यात २४ जूनच्या आंदोलनात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हा, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आवाहन केले.*

## 'कर्नाळा'च्या १३ हजार ७२ ठेवीदारांना विम्यापोटी २६२ कोटी ६५ लाखांचे वाटप




**पनवेल : प्रतिनिधी**

रिझर्व बँक ठेवी विमा संरक्षण व क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशनच्या नियमानुसार ठेवीदारांना प्रत्येकी पाच लाख रूपये परत देण्यात येत आहेत. त्यानुसार आतापर्यंत १३ हजार ७२ ठेवीदारांना २६२ कोटी ६५ लाख रूपये परत देण्यात आले आहेत.

कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार विवेकानंद शंकर पाटील यांच्या भ्रष्ट आणि गैरकारभारामुळे बुडीत निघालेल्या कर्नाळा बँकेच्या ठेवीदारांना केंद्र सरकारने बदलेल्या 'डिआयसीजीसी'च्या नव्या नियमनानुसार अधिकाधिक पाच लाख रूपये देता येतात. त्यामुळे कर्नाळाच्या खातेदारांना थोडासा दिलासा मिळाला आहे.

कर्नाळा बँकेच्या ज्या ठेवीदारांनी अद्याप पैसे नेले नाहीत त्यांनी बँकेशी संपर्क साधावा, असे आवाहन बँकेचे अवसायक ए. आर. हांडे यांनी केले आहे. शनिवारी (दि. २१) ए ते आर या आद्याक्षरानुसार ठेवीदारांना पुन्हा एकदा संधी देण्यात येत आहे. ज्यांच्या ठेवी ५० हजार अथवा त्यापेक्षा कमी आहेत ती मंडळी पैसे घेण्यासाठी बँकेकडे फिरकलेली नाहीत.

**बँकेत ठेवीदारांना त्यांच्या नावाच्या इंग्लिश अल्फाबेटिकलप्रमाणे बोलावून पैसे दिले गेले. त्यावेळी ज्यांना येता आले नाहीत त्या ए ते आर अल्फाबेटिकलमधील ठेवीदारांसाठी शनिवारी (दि. २१) खास सोय करण्यात आली आहे. त्या दिवशी त्यांनी बँकेत येऊन कागदपत्रे दाखल करावीत.**
**–ए. आर. हांडे, अवसायक, कर्नाळा बँक**

फारच कमी ठेवीदारांनी बँकेशी संपर्क साधला आहे. कर्नाळा बँक २४ मेपर्यंत आद्याक्षरानुसार म्हणजेच अल्फाबेटिकल टी पर्यंतच्या ठेवीदारांचे वाटप पूर्ण करणार असल्याने अशा ठेवीदारांनी लवकरात लवकर संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले.

(पान २ वर...)

## निवडक

### नवज्योतसिंग सिद्धू यांना तुरुंगवासाची शिक्षा

**नवी दिल्ली :** काँग्रेसचे पंजाबमधील नेते नवज्योतसिंग सिद्धू यांना एका वर्षाच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. १९८८ च्या रोड रेज प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी (दि. १९) ही शिक्षा सुनावली. या प्रकरणी पीडितेच्या कुटुंबाच्या वतीने पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायमूर्ती चेलमेश्वर आणि न्यायमूर्ती संजय किशन कौल यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला.

### पुण्यात २२ मे रोजी 'राज'सभा

**पुणे :** पुण्याचा दौरा अर्धवट ठेवून मुंबईला परतलेले महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची सभा रविवारी (दि. २२) गणेश कला क्रीडा मंच येथे होणार आहे. यासंदर्भातील अधिकृत घोषणा करण्यासाठी आणि अयोध्या दौऱ्यावर जाण्यापूर्वी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी राज ठाकरे पुण्यामध्ये आले होते.

## मुंबईत झगडणाऱ्या राणा-राऊतांचा सूर लेहमध्ये जुळला

**मुंबई : प्रतिनिधी**

संसदेतील परराष्ट्र व्यवहार समितीकडून लेहमध्ये अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त विरोधकांवर तुटून पडणारे संजय राऊत आणि सत्ताधाऱ्यांवर टीका करणारे राणा दाम्पत्य सध्या एकाच वेळी लेह दौऱ्यावर आहेत. या दौऱ्याचे काही व्हिडिओ समोर आले असून एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले राणा आणि संजय राऊत एकाच पंगतीत बसलेले दिसतात, तसेच दोघेही एकमेकांसोबत चर्चा करतानादेखील दिसत आहेत.

राणा दाम्पत्याने मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री निवासस्थानाबाहेर हनुमान चालिसा वाचणार असल्याचे सांगितल्यानंतर मुंबईत विविध घडामोडी घडल्या. त्यावेळी शिवसनेचे खासदार संजय राऊत यांनीही अनेक गंभीर आरोप राणा दाम्पत्यावर केले. खासदार नवनीत राणा यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे तक्रारदेखील केली होती. त्यानंतर त्यांनी लोकसभा अध्यक्षांना भेटून आम्हाला तुरुंगात वाईट वागणूक दिल्याचे सांगितले होते. त्यानंतर मात्र संसदीय समितीच्या अभ्यास दौऱ्यासाठी राणा दाम्पत्य लेहकडे रवाना झाले. विशेष म्हणजे या दौऱ्यात खासदार संजय राऊत देखील आहे. या वादाचा परिणाम लेह दौऱ्यावर होणार का? असा प्रश्न होता, पण संजय राऊत आणि आमदार रवी राणा यांच्यामध्ये चांगल्या गप्पागोष्टी रंगल्याचे दिसत आहे.

# ओबीसी मंत्र्यांनो, आता तरी हिंमत दाखवा

### भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांचे आव्हान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाविकास आघाडी सरकारच्या बेफिकीरीमुळे ओबीसी राजकीय आरक्षण राज्यात गमावले व ते पुन्हा मिळत नाही. सरकारमधील ओबीसी मंत्र्यांनी आता तरी लाचारी सोडावी आणि ओबीसींना राजकीय आरक्षण मिळण्यासाठी मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची हिंमत दाखवावी, असे आव्हान भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि. १९) दिले.



आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, ओबीसींना राजकीय आरक्षण देताना ते किती प्रमाणात द्यावे हा प्रश्न आहे व त्यासाठी समर्पित आयोगामार्फत इम्पिरिकल डेटा अर्थात ओबीसींची वस्तुस्थितीनुसार आकडेवारी गोळा करून प्रमाण ठरवणे आणि एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवणे गरजेचे आहे. सर्वोच्च न्यायालयाने ४ मार्च २०२१ रोजी महाराष्ट्रातील ओबीसी राजकीय आरक्षण स्थगित करतानाच ते पुन्हा लागू करण्यासाठी ही तिहेरी चाचणी पूर्ण करण्यास सांगितले होते, मात्र महाविकास आघाडी सरकारने नेमके हेच काम केले नसल्याने राज्यातील ओबीसी राजकीय आरक्षण पुन्हा लागू होत नाही. दुसरीकडे मध्य प्रदेशने न्यायालयाच्या आदेशानंतर ताबडतोब डेटा गोळा करून चाचणी पूर्ण केली व ओबीसी आरक्षण पुन्हा मिळवले.

मध्य प्रदेशमधील भाजप सरकारच्या यशानंतर महाविकास आघाडी सरकारचे अपयश पुन्हा स्पष्ट झाले आहे. या सरकारमधील ओबीसी मंत्र्यांनी आता तरी सत्तेची लाचारी सोडावी आणि सरकारवर दबाव आणण्यासाठी मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची हिंमत दाखवावी.

इम्पिरिकल डेटा गोळा करून तिहेरी चाचणी पूर्ण केली की, ओबीसी राजकीय आरक्षण परत मिळणार हे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावरून स्पष्ट होते, परंतु आता मध्य प्रदेशचा निकाल आल्यावर नवा शोध लागल्यासारखे या सरकारचे मंत्री महाराष्ट्रालाही आपोआप आरक्षण मिळेल, अशी दिशाभूल करीत आहेत. महाविकास आघाडीने इम्पिरिकल डेटा गोळा करण्यात अक्षम्य टाळाटाळ केल्यामुळेच ओबीसींना परत आरक्षण मिळत नाही.

या अपयशाची जबाबदारी सरकारमधील ओबीसी मंत्र्यांचीही आहे. त्यामुळेच त्यांनी आता तरी समाजासाठी हिंमत दाखवावी व ओबीसी आरक्षणासाठी प्रयत्न करावे व मध्य प्रदेशप्रमाणे महाराष्ट्राने तिहेरी चाचणी पूर्ण करून आरक्षण परत मिळविण्यासाठी मंत्रिपदाचे राजीमाने देऊन सरकारवर दबाव आणावा, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आव्हान केले आहे.

## संकष्ट चतुर्थीनिमित्त पाली, महड गजबजले

### गणेशभक्तांच्या उपस्थितीने मंदिर परिसराला जत्रेचे स्वरुप




**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील अष्टविनायकांपैकी रायगड जिल्ह्यात असणाऱ्या पाली व महड येथे गुरुवारी (दि. १९) संकष्ट चतुर्थीनिमित्त दर्शनासाठी भक्तांची अलोट गर्दी झाली होती.

पाली येथील श्री बल्लाळेश्वर व महड येथील श्री वरदविनायक ही दोन गणपतीची स्थळे अष्टविनायकांपैकी महत्त्वाची धार्मिक स्थळे असल्याने येथे कायमच भक्तांची गर्दी पहायला मिळते. त्यात सध्या सुटीचा हंगाम व गुरुवारी संकष्ट चतुर्थी असल्याने भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले होते.

पाली येथील श्री बल्लाळेश्वराच्या मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले.

त्याचप्रमाणे खालापूर तालुक्यातील महड येथे श्री वरदविनायक मंदिरातही पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. मंदिरातील गाभाऱ्याला आकर्षकरित्या सजविण्यात आले होते. महड गणपती संस्थानतर्फे अध्यक्ष मोहिनी वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर व मंदिराबाहेर चोख सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कुठे भक्तांना त्रास होणार नाही यासाठी व्यवस्थापक बडगुजर हे लक्ष ठेवून होते.

## चेतन घरत यांना कारणे दाखवा नोटीस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील वहाळ ग्रामपंचायतीचे सदस्य चेतन रामचंद्र घरत यांनी पक्षविरोधी भूमिका घेतल्याने त्यांना भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

पनवेल तालुक्यातील वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे यांच्याविरोधातील अविश्वास ठरावावर ग्रामपंचायतीचे सदस्य चेतन घरत यांनी स्वाक्षरी करून भाजपच्या विरोधात भूमिका घेतली आहे. त्यामुळे याबाबत चेतन घरत यांनी तातडीने खुलासा करावा, अशी कारणे दाखवा नोटीस भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी चेतन घरत यांना दिली आहे.

## 'ज्ञानवापी'च्या राजकीय परिणामांचा विचार करीत नाही

### संजय राऊतांच्या टीकेवर देवेंद्र फडणवीसांचा टोला



**मुंबई : प्रतिनिधी**

२०२४च्या निवडणुकांच्या तयारीसाठी भाजप ज्ञानवापीचा मुद्दा वापरीत असल्याची टीका शिवसेनेचे खासदार संजय राऊत केली होती. यावर भाजपचे विरोधी देवेंद्र फडणवीस म्हणाले, संजय राऊत रोजच टीका करतात. त्यांनी आम्ही महत्त्व देत नाही. ज्ञानवापीच्या राजकीय परिणामांचा आम्ही विचार करीत नाही. हा श्रद्धेचा विषय आहे. देशात हे विषय न्यायालयाच्या माध्यमातून सोडवले जात आहेत. ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. न्यायालयाने कोर्ट कमिशनर नियुक्त केला. त्यांचा जो रिपोर्ट येईल त्यावर न्यायालय जो निर्णय देईल तो महत्त्वाचा असेल, असे फडणवीसांनी सांगितले मात्र आपल्या सर्वांना हा इतिहास माहिती आहे की, कशाप्रकारे मंदिरांवर आक्रमणे करून औरंगजेबाने ते मंदिर कसे तोडले होते, असेही फडणवीस यांनी नमूद केले.

### संभाजीराजेंच्या पाठिंब्याबाबत केंद्रीय स्तरावर निर्णय

छत्रपती संभाजीराजे यांना मागच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट राष्ट्रपती कोट्यातून राज्यसभेवर पाठवले होते. आता त्यांना भाजपचा पाठिंबा द्यायचा की, नाही याचा केंद्रीय स्तरावर निर्णय होईल. त्यामुळे याबाबत निर्णय झाला की सांगू, असे फडणवीसांनी सांगितले.

# बालगंधर्व पुनर्विकास गरजेचा

## ■ भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांची पुणे महापालिकेला सूचना

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येमुळे शहराचा विकास अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून करणे आवश्यक आहे. त्यामध्येच बालगंधर्व नाट्यगृहाचा पुनर्विकासही गरजेचाच आहे. मात्र महापालिका प्रशासनाने यासंदर्भातील विरोधाचे कारण लक्षात घेऊन खासगी नाट्यगृह चालकांशी चर्चा करून तोडगा काढावा, अशी सूचना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी गुरूवारी केली.

चंद्रकांत पाटील यांनी आज बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकास प्रकल्पाचा आढावा घेतला. यावेळी माजी महापौर मुरलीधर मोहोळ, भाजपा कोथरूड मंडल अध्यक्ष पुनीत जोशी, आशुतोष वैशंपायन यांच्यासह चित्रपट आघाडीचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पाटील म्हणाले की, पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येमुळे शहराचा विकास देखील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन सर्वांना उत्तम सुविधा पुरविणे ही काळाची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी नदीसुधार प्रकल्प असो किंवा बालगंधर्व नाट्यगृहाचा पुनर्विकास असो, वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने हे दोन्ही प्रकल्प साकारणे आवश्यक आहेत. बालगंधर्व नाट्यगृहाचा पुनर्विकास अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात येणार असल्यामुळे पुणे शहराच्या सौंदर्यात भरच पडणार आहे. कारण पुनर्विकासात नाट्य संस्कृतीच्या जोपासनेसह, नव्या पिढीमध्ये मराठी नाट्य क्षेत्राबद्दल ओढ निर्माण व्हावी यासाठीचे सर्व प्रकारचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच याचा पुनर्विकास होताना जागेचा व्यावसायिक कारणांसाठी वापर होणार नसल्याचे स्पष्ट होत आहे.



नव्या नाट्यगृहाच्या पुनर्विकासात एक हजार, पाचशे आणि तीनशे आसन क्षमतेचे रंगमंच उभारण्यात येणार असल्यामुळे वेगवेगळ्या कार्यक्रमांसाठी नाट्यगृह उपलब्ध होईल. त्यासोबतच नाट्यप्रेमींनाही नवनवीन नाटकांचा आस्वाद घेता येईल. त्यामुळे बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकासाचे सादरीकरण पाहिल्यानंतर हे रंगमंदिर भविष्यात जागतिक दर्जाचे होईल असा विश्वास पाटील यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

सध्या पुनर्विकासासाठी जो विरोध होत आहे, त्यामध्ये प्रामुख्याने पुनर्विकासाच्या दोन वर्षांच्या कालावधीत नाट्यरसिकांना आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व कलाकारांना, नाट्यगृहापासून वंचित रहावे लागणार असल्याची भिती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने शहरातील इतर खासगी नाट्यगृह चालकांशी चर्चा करून, यावर तोडगा काढावा, आणि किमान पुनर्विकासाचे काम पूर्ण होईपर्यंत अत्यल्प दरात महापालिकेसह खासगी नाट्यगृहे नाट्यरसिकांसाठी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

# नेरळ-माथेरान घाटात सुमो गाडीला अपघात; प्रवासी सुखरुप

(छाया : संतोष पेरणे)



**कर्जत : बातमीदार**

चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने पर्यटकांच्या सुमो कारला बुधवारी (दि. १८) दुपारी नेरळ-माथेरान घाटात अपघात झाला. मात्र कारमधील सहा प्रवासी सुखरूप बचावले.

मुंबईतील सहा पर्यटक बुधवारी माथेरान फिरण्यासाठी टाटा कंपनीची सुमो कार (एमएच-०४,बीडी ८६६६) घेऊन आले होते. नेरळ-माथेरान घाटातील जुम्मापट्टी जवळील एका वळणावर वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने सुमो कार मागे येऊन रस्त्याच्या कडेला असणाऱ्या सुरक्षा कठड्याच्या रेलिंगवर आदळली.

या अपघातात सुदैवाने सर्व पर्यटक थोडक्यात बचावले आहेत. येथील टॅक्सी चालक व काही स्थानिक ग्रामस्थांनी या पर्यटकांना कारमधून खाली उतरण्यास मदत केली. या ठिकाणी अपघाताची ही आठवड्याभरातील तिसरी घटना असून, मंगळवारी याच ठिकाणी चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने एक रिक्षा थेट सुरक्षा रेलिंग तोडून पलिकडे धसवाडीत जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला उलटली होती. एका मोटारसायकलचा देखील येथे अपघात घडला होता. या तीनही अपघातात सर्व प्रवासी थोडक्यात बचावले आहेत.

# ग्रामीण भागातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी सरकारचे लक्ष वेधणार

## ■ केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी आपण सरकारचे लक्ष वेधणार असल्याचे रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.

डोंबिवलीजवळच असलेल्या देसलेपाडा भोपर गावात खदानीमध्ये कपडे धुण्यासाठी आलेल्या एकाच कुटुंबातील पाच जणांचा बुडून मृत्यू झाला. त्या शोकाकूल परिवाराची रामदास आठवले यांनी सांत्वनपर भेट घेतली. या वेळी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांशी आणि कल्याण डोंबिवली मनपा आयुक्तांशी दूरध्वनीद्वारे चर्चा करून धोकादायक खदाणी त्वरीत बुजवून टाकाव्यात आणि पाण्याची समस्या त्वरीत सोडविण्याबाबत आठवले यांनी चर्चा केली. यावेळी डोंबिवली ग्रामीण भागात देसलेपाडा येथें पाण्याची टाकी बांधून सर्वांना नळ जोडणीद्वारे पाणीपुरवठा करण्याबाबतचे काम लवकर होईल अशी माहिती मनपा आयुक्तांनी रामदास आठवले यांना दिली. तसेच डोंबिवलीप्रमाणे राज्यभरात खोदकाम करून होणारे खड्डे, डबके, धोकादायक खदाणी त्वरीत बुजवाव्यात किंवा त्यांना संरक्षण जाळी बसवावी तसेच अनेक ठिकाणी पाणीपुरवठा होत नाही. अनेक ठिकाणी पाण्याची समस्या आहे. या मुळे पाण्यासाठी जीव धोक्यात घालून खदाणीकडे लोक जातात ते थांबविण्यासाठी आपण शासनाला पत्र पाठवून जनतेच्या या मागणीकडे त्यांचे लक्ष वेधणार आहोत असे आठवले म्हणाले. या वेळी रिपाइंचे जिल्हा अध्यक्ष प्रल्हाद जाधव, डोंबिवली शहर अध्यक्ष अंकुश गायकवाड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# राजाभाऊ काळे यांचे निधन

**खोपोली :** कर्जत येथील रा.स्व. संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते दत्तात्रय धोंडो उर्फ राजाभाऊ काळे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले.



दरम्यान राजाभाऊ बालपणापासून संघाचे स्वयंसेवक होते. जनता सहकारी ग्राहक भांडार, कर्जत तालुका प्राथमिक पतपेढी, अभिनव ज्ञान मंदिर शिक्षण संस्था, कर्जत तालुका प्राथमिक पतपेढी, लक्ष्मीकांत सार्वजनिक वाचनालय, ओक प्रतिष्ठान, डॉ. हेडगेवार स्मारक समिती अशा विविध सामाजिक शैक्षणिक संस्थांवर त्यांनी काम केले. अचूक हिशोब, सचोटी व वेळेत काम करणे असा त्यांचा नेहमी आग्रह असायचा. त्यांचे घर म्हणजे संघाच्या कार्यकर्त्यांचे घर असायचे. आपले घरदार सोडून पूर्ण वेळ संघाच्या कामासाठी बाहेर पडलेल्या प्रचारकांचे त्यांनी पालक म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. अयोध्या आंदोलनात त्यांचा सक्रिय सहभाग तसेच आणीबाणीत नेहमी संघाचे काम ते करत होते.

# 'सीयुईटी' जुलैच्या अखेरच्या आठवड्यात

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय विद्यापीठांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची सामायिक विद्यापीठ प्रवेश परीक्षा (सीयुईटी) जुलैच्या अखेरच्या आठवड्यात होणार आहे. त्यासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया गुरुवारपासून सुरू करण्यात आली असून विद्यार्थ्यांना १८ जूनपर्यंतच्या मुदतीत राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाच्या (एनटीए) संकेतस्थळावरून अर्ज भरता येईल. या परीक्षेमार्फत देशभरातील ४२ केंद्रीय विद्यापीठांसाठीची प्रवेश प्रक्रिया राबविली जाईल.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष प्रा. जगदेशकुमार यांनी ट्विटद्वारे ही माहिती दिली. केंद्रीय विद्यापीठांतील प्रवेशांसाठी सीयुईटी आयोजित करण्याची घोषणा युजीसीकडून नुकतीच करण्यात आली. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३साठी एनटीएकडून केंद्रीय विद्यापीठांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सीयुईटीची प्रक्रिया राबवली जाईल.

एनटीएच्या संकेतस्थळावर सीयुईटीमध्ये सहभागी केंद्रीय विद्यापीठांची यादी आणि अन्य तपशील उपलब्ध करण्यात आल्याचे असे स्पष्ट करण्यात आले आहे. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

# भारतातील पहिले विदेशी पक्षी उद्यान नागरिकांसाठी होणार खुले

## एस्सेल वर्ल्ड 'बर्ड पार्क' पुन्हा सुरू; पक्ष्यांचा किलबिलाट अनुभवता येणार

**मुंबई : प्रतिनिधी**

जगभर ओढावलेल्या कोरोनाच्या संकटामुळे राज्यातील पर्यटन स्थळावर नागरिकांना जाण्यास मज्जाव करण्यात आला होता. यावर्षी कोरोनाचा प्रसार कमी होताच राज्यसरकारने अनेक पर्यटन स्थळांवरची बंदी उठविली. निर्बंधाच्या शिथिलतेनंतर पक्षीप्रेमींसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू असणारे एस्सेल वर्ल्ड बर्ड पार्क सुद्धा पुर्ववत करण्यात आले आहे. राज्यातील आणि जगभरातील पक्षप्रेमींना पुन्हा एकदा विविध पक्ष्यांच्या प्रजातींना पाहता येणार आहे.




एस्सेल वर्ल्ड 'बर्ड पार्क' हे भारतातील पहिले विदेशी पक्षी उद्यान आहे. या उद्यानात सुमारे ५०० हून अधिक पक्ष्यांच्या प्रजातींना ठेवण्यात आले आहे. तर जगभरातील ५०हून अधिक दुर्मिळ प्रजातीचे पक्षी या संग्रहालयात ठेवण्यात आले आहेत. मुंबईतील गोराई परिसरात वसलेल्या या उद्यानात देशातीलच नव्हे तर विदेशातील पक्ष्यांना राहता येईल असे सुरक्षित वातावरण निर्माण करण्यात आले आहे. यासाठी विविध प्रजातींचे पक्षी आता या उद्यानात पाहता येणार आहेत.

एस्सेलवर्ल्ड बर्ड पार्कमधील मुख्य आकर्षण म्हणजे ३ मीटर (९.८ फूट) व्यासाचे पान असलेले व्हिक्टोरिया लिली फुल आहे. लहान मुले या फुलावर बसू शकतात.

भारतात अत्यंत दुर्मिळ असलेली १४५ दशलक्ष वर्षांपूर्वीची ज्युरासिक-काळातील वनस्पती 'ट्री फर्न' हे बर्ड पार्कमध्ये लावण्यात आले आहे. महाराष्ट्राचे राज्य फूल द प्राईड ऑफ इंडिया हे प्रमुख आकर्षण या उद्यानाचे आहे. नैसर्गिक वाळवंट पर्यटकांना अनुभवता यावा यासाठी २० पेक्षा जास्त वेगवेगळ्या प्रकारच्या निवडूंगाची लागवड करण्यात आली आहे.

# आदित्य ठाकरेंनी मुंबईकरांची माफी मागावी

## ■ भाजपचे आमदार आशिष शेलारांचे टिकास्त्र

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळा तोंडावर आला असताना मुंबईतील नालेसफाईची कामे काटावर पास व्हावी एवढी पस्तीस टक्केच झाली असल्याचा घणाघाती आरोप भाजपचे आमदार आशिष शेलार यांनी केला. तसेच २५ वर्षांच्या सत्तेनंतर मुंबईकरांना सुरक्षेची हमी देऊ शकत नसतील तर आदित्य ठाकरे यांनी मुंबईकरांची माफी मागावी अशा शब्दांत आशिष शेलार यांनी समाचार घेतला. शेलार यांच्या नेतृत्वाखाली भाजपाच्या नगरसेवकांनी मुंबईतील नालेसफाईच्या कामाचा दुसऱ्या टप्प्यातील पाहणी दौरा केला.

मालाड येथील वलनाई, जूहू येथील एसएनडीटी तर कुर्ला येथील मिलिंद नगर नाल्यावर जाऊन कामाची पाहणी करण्यात आली. तिन्ही ठिकाणी भयावह चित्र असून नाल्यामध्ये गाळाचे ढिगारे तसेच पहायला मिळत आहेत. या दौऱ्यानंतर भाजपाच्या शिष्टमंडळाने पालिका आयुक्त इक्बाल चहल यांची भेट घेऊन निवेदनासह मुंबईतील नाल्यांचा सचित्र अहवाल सादर केला. त्यानंतर महापालिका मुख्यालयातील भाजपा पक्ष कार्यालयात बैठक घेऊन आमदार आशिष शेलार यांनी या संपूर्ण दौऱ्याची माहिती दिली. यावेळी ते म्हणाले की, ज्या गोष्टी टाळता येऊ शकतात, पूर्ण होऊ शकतात, नियोजन होऊ शकते अशा गोष्टी सुद्धा पालिका प्रशासन जाणूनबुजून करताना दिसत नाही. आम्ही जेव्हा सात एप्रिलला नालेसफाईची पाहणी करायला उतरलो त्यावेळी सत्ताधारी शिवसेनेकडून आमच्या या पाहणी दौऱ्यावर टीका करण्यात आली. स्वतः तेव्हाही ते फरार होते आणि आजही फरार आहेत. जेव्हा दुसऱ्या टप्प्यातील दौऱ्याचे नियोजन आम्ही सुरू केले त्यानंतर संध्याकाळी पालकमंत्री आदित्य ठाकरे यांनी अंधारात जाऊन नालेसफाईची पाहणी केली. उजेडात होते पुण्य अंधारात पाप या गाण्याच्या ओळीची आठवण करून देत हे कसले अंधारात पाप सुरू आहे? असा खोचक सवालही त्यांनी केला.

### पावसापूर्वीच्या कामांचे योग्य नियोजन नाही

***पालिका आयुक्तांना आम्ही भेटणार असे कळताच पालकमंत्र्यांनी धावाधाव करून आयुक्तांना भेटून गेले. एवढे दिवस हे कोठे होते? असा सवालही शेलार यांनी केला. मुंबईकरांना वाऱ्यावर सोडून महापालिकेतील सत्ताधारी फरार आहेत आणि मुंबईतील नालेसफाईचे चित्र मात्र अत्यंत भयावह आहे. नालेसफाईची केवळ ३५ टक्केच कामे झाली आहेत. त्यामुळे यावर्षी पावसाळ्यात मुंबईकर सुरक्षित नाहीत. याला जबाबदार महापालिका प्रशासन आणि सत्ताधारी शिवसेना असल्याचेही आमदार शेलार म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी एक महिन्यापूर्वी बैठक घेतली त्या बैठकीत काय ठरले त्यानंतर कामाचे नियोजन का केले नाही? आता पाऊस तोंडावर आल्यावर पालकमंत्र्यांची धावपळ सुरू आहे. एकूणच मुंबईकडे पालकमंत्री आदित्य ठाकरे आणि मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे लक्ष नाही असाही आरोप त्यांनी केला.***



# किरण इनामदारला एक दिवसाची पोलीस कोठडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याविरोधात अभिनेत्री केतकी चितळे हिने वादग्रस्त फेसबुक पोस्ट केली होती. तिची पोस्ट शेअर करणाऱ्या पनवेल येथील किरण इनामदार याला शुक्रवार (दि. २०) पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी पाच दिवसांची पोलीस कोठडीची मागणी केली होती मात्र न्यायालयाने केवळ एकच दिवसाच्या पोलीस कोठडीचा आदेश केलेला आहे.

केतकी चितळेने शरद पवार यांच्याबद्दल बदनामीकारक फेसबुक पोस्ट केली होती. हीच पोस्ट इनामदार तरुणाने शेअर केली होती. या प्रकरणी इनामदार याच्यावर गुन्हा दाखल होता.

## पान १ वरून

# 'कर्नाळा'च्या १३ हजार ७२ ठेवीदारांना विम्यापोटी २६२ कोटी ६५ लाखांचे वाटप

रिझर्व्ह बँकेने कर्नाळा बँकेचा व्यवसाय परवाना बँकिंग बिझनेस इन इंडिया अंडर रेग्युलरेशन २२ सेक्शन, रेग्युलरेशन अॅक्ट १९४९नुसार रद्द केल्यामुळे कर्नाळा बँकेत ठेवलेल्या रकमेपैकी पाच लाखांपर्यंतच्या ठेवी रिझर्व्ह बँक ठेवी विमा संरक्षण व क्रेडिट गॅरेंटी कॉर्पोरेशनच्या नियमनानुसार ठेवीदारांना परत देण्यात येत आहेत. एकूण पाच लाखांपर्यंत पैस देण्यात येत असलेल्या परताव्यासाठी ३७४ कोटी रूपयांपैकी १३ हजार ७२ ठेवीदारांना २६२ कोटी ६५ लाख रूपये देण्यात आले आहेत. पाच लाखांपेक्षा जास्त ठेवी असलेले दोन हजार ९०० ठेवीदार आहेत. त्यापैकी दोन हजार ५०० ठेवीदारांच्या ठेवी पाच लाखांपेक्षा कमी असून त्या दोन ते तीन लाखांदरम्यान आहेत.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. cost |
|---|---|---|
| Tend-10/22-23 **7000023252** | Procurement of 36kV Circuit Breakers under EHV O&M circle , Panvel. | **Rs. 13.20 Lakhs** |
| Tend-12/22-23 **7000023181** | AMC for attending oil leakage from various joints of EHV Power Transformer /ICT at various substation under EHV (O&M) Circle Panvel by using latest technology **"power seal online gasketing"** | **Rs. 50.00 Lakhs** |
| Tend-13/22-23 **7000023159** | Replacement of 220kV, 100 kV Lightning Arrestors required at various substations under EHV O&M Circle Panvel. | **Rs. 70.97 Lakhs** |
| Tend-14/22-23 **7000023225** | AMC for routine maintenance of Nitrogen injection fire protection system (NIFPS) including replacement of faulty spares at various substation under Panvel circle. | **Rs. 25.00 Lakhs** |
| Tend-15/22-23 **7000023237** | Work of re-orientation of 220 KV Mahad-Kalambani Line and Mahad-Kandalgaon Line from Loc.No.8 to 14 to avoid tower collapsed etc. occurrence under EHV (O&M) Dn Mahad. | **Rs. 269.04 Lakhs** |
| Tend-16/22-23 **7000023331** | Work of DGA oil testing and other standard test at various Substation under EHV (O&M) Circle, Panvel | **Rs. 15.00 Lakhs** |

EMD 1% of estimated cost. **Tender fee Rs. 5000/- or minimum Rs. 500/- each tender** + GST **Submission of bids from 19.05.2022 to 26.05.2022 up to 23:59 hrs, Opening date:-27.05.2022 @ 10:00 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** The Executive Engineer(Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9167026141 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**




**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शुक्रवार, दि. २० मे २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# आमदार महेश बालदींच्या पाठपुराव्याला यश

## लोहोप गावासाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा कार्यान्वीत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे लोहोप गावासाठी आदित्य बिर्ला हायटेक कार्बन कंपनीतर्फे शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येणार आहे.



उरण मतदार संघात व खालापूर तालुक्यात असणाऱ्या लोहोप गावात येथील आदित्य बिर्ला हायटेक कार्बन कंपनीतून पसरणाऱ्या चारकोळ पावडरमुळे लोहोप व बाजूच्या परिसरातील ग्रामस्थांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला होता. यासंदर्भात उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांनी अधिवेशनात आवाज उठविला होता. कंपनीने गावकऱ्यांच्या आरोग्याचा गांभीर्याने विचार करावा, अशा आशयाचे पत्र आमदार महेश बालदी यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले होते. त्या अनुषंगाने आदित्य बिर्ला हायटेक कार्बन कंपनीतर्फे सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत लोहोप गावाकरीता आरओ वॉटर सप्लाय युनिटचे उद्घाटन करण्यात आले.

खालापूर तालुक्यातील तळवली-लोहोप येथे आदित्य बिर्ला हायटेक कार्बन कंपनी असून या कंपनीत निर्माण होणारी प्रदूषण युक्त काळी पावडर लोहोप तसेच आजूबाजूच्या परिसरात हवेद्वारे पसरत असून सर्व झाडे, शेतजमिनी, भातशेती, पिण्याचे पाणी तसेच वातावरणातील हवेत प्रसारित होत असल्याने ग्रामस्थांना श्वसन तसेच सबंधित जिवघेण्या आजारांना सामोरे जावे लागते. यामध्ये विशेषत: लहान मुले, वृद्ध व गरोदर महिला यांच्या आरोग्यास अधिक धोका संभवतो. त्यामुळे परिस्थितीचा गांभीर्याने विचार करता आदित्य बिर्ला हायटेक कार्बन कंपनीमार्फत होणारे हवा प्रदूषण थांबविण्यासंदर्भात सबंधित अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश द्यावेत, असे पत्र आमदार महेश बालदी यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले होते. या मागणीची दखल घेत कंपनीनेतरी गावासाठी एखादी योजना राबविली. त्याबद्दल गावकऱ्यांनी आमदार महेश बालदी यांचे आभार मानले आहेत.



# गाडी विकण्याच्या बहाण्याने खारघरमधील तरुणाची फसवणूक

## सायबर भामट्याचा शोध सुरू

**पनवेल : वार्ताहर**

ओएलएक्सवर स्कुटीच्या विक्रीची जाहिरात देऊन एका सायबर चोरटयाने खारघरमध्ये राहणाऱ्या एका महाविद्यालयीन तरुणाकडुन ऑनलाइन ४९,६९० रुपये उकळून त्याची फसवणुक केल्याचे उघडकीस आले आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणातील सायबर चोरटयाविरोधात फसवणुकीसह आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.

या प्रकरणात फसवणुक झालेला विद्यार्थी यासीर अब्दुल्ला हुनेरकर (वय २२) हा खारघर सेक्टर-३४मध्ये राहण्यास असून सध्या तो एमबीएचे शिक्षण घेत आहे. यासीरला वापरासाठी दुचाकी गाडी घ्यायची असल्याने तो सेकंडहँड दुचाकीचा शोध घेत होता. यादरम्यान, त्याला ओएलएक्सवर होंडा ॲक्टीवा विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात निदर्शनास आली. त्यामुळे यासीर याने जाहिरातीत असलेल्या गाडीचा मालक टोपासिंग चौहान याला संपर्क साधुन ॲक्टीवाच्या आरसी बुकची मागणी केली असता, त्याने यासीरच्या व्हॉट्सॲपवर आरसी बुक व गाडीचे फोटो तसेच स्वतःचे सीआयएसएफचे ओळखपत्र पाठवून दिले. या वेळी भामट्या टोपासिंग याने तो सीआयएसएफमध्ये कॉन्स्टेबल असल्याचे तसेच त्याची बदली होणार असल्याने तो गाडी विकत असल्याचे यासीरला सांगितले.

या दोघांमध्ये स्कुटी खरेदी विक्रीचा व्यवहार ४९,६९० रुपयांमध्ये ठरल्यानंतर भामट्या टोपासिंग याने त्याला गुगल पेद्वारे पैसे पाठविण्यास सांगून त्याला क्युआर कोड पाठवुन दिला. यासीरने त्याला पैसे पाठवुन दिल्यानंतर भामटया टोपासिंग याने कुरीयरद्वारे गाडी पाठविण्याचा बहाणा करुन त्याला कुरीयर चालकाचा नंबर दिला. त्यानंतर भामट्या टोपासिंग याने यासीरला इन्शुरन्सचे २२ हजार रुपये जमा करण्यास सांगितल्याने त्याला संशय आला. त्यामुळे त्याने सदरची रक्कम पाठवली नाही. त्यानंतर देखील टोपासिंग हा यासीरकडे पैशांची मागणी करू लागल्यानंतर आपली फसवणूक होत असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यानंतर खारघर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करून या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

# पाऊस लवकर सुरू होणार असल्याने पनवेल मनपा आपत्ती व्यवस्थापन सज्ज

**पनवेल : प्रतिनिधी**

यावर्षी पाऊस लवकर सुरू होणार असल्याने पालिकेतील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांनी आपली तयारी सुरू करून त्याअधिक बळकट करण्यासाथी विविध उपाय योजना करण्यात येत आहेत. अद्ययावत पंप्स, झाडे पडल्यास ती बाजूला करण्यासाठी कटर त्यासाठी लागणारे मनुष्यबळ वाढविण्यात येणार आहे.

आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेप्रमाणे मान्सुनपूर्व करावयाची कामे तसेच आपत्ती व्यवस्थापन विषयक महत्वाच्या सूचना देण्यासाठी नुकतीच उपायुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेतील विभाग प्रमुख, अधिकारी यांची बैठक घेण्यात आली. या वेळी सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर,उपअभियंता विलास चव्हाण, सर्व प्रभागअधिकारी, आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रमुख दशरथ भंडारी,अग्निशमन विभाग प्रमुख अनिल जाधव, सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

आपत्ती व्यवस्थापन, मदत पुर्नवसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी नुकत्याच घेतलेल्या बैठकित दिलेल्या सूचनेप्रमाणे पावसाळ्यापूर्वीची कामे, नाले सफाई, धोकादायक इमारती निष्कांसित करणे, धोकादायक वृक्ष तोडणे तसेच फांद्या तोडणे, अर्धवट बांधकामे पूर्ण करणे अशा विविध सूचना या वेळी संबधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

नियंत्रण कक्ष स्थापन करणे, समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करणे, आपत्ती काळात नागरिकांना सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी जागांची निवड करणे, त्यांच्या प्राथमिक गरजा, औषधोपचारांची पूर्तता करण्याची सोय करण्यासाठीचे नियोजन करण्याच्या सूचना उपायुक्त पवार यांनी दिल्या. पूर, अतिवृष्टी काळात पाणी साठू नये यासाठी पावसाळ्या पूर्वी नालेसफाई, चेंबर सफाई, अद्ययावत पंप्सची सोय करणे, झाडे पडल्यास ती बाजूला करण्यासाठी कटर त्यासाठी लागणारे मनुष्यबळ वाढविण्याबाबत सूचना देण्यात आल्या.





# कामोठे सेक्टर १० व १९मध्ये डस्टबीनचे वाटप

## पनवेल मनपा सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

युवकांचे प्रेरणास्थान आणि पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी (दि. १८) पनवेलमध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. त्याअंतर्गत पनवेल महापालिकेचे नगरसेवक विजय चिपळेकर यांच्या नगरसेवक निधीमधून डस्टबीन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कामोठे सेक्टर १० आणि १९ मध्ये डस्टबीनचे वाटप करण्यात आले.

या वेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक विकास घरत, भाजपचे कामोठे शहर चिटणीस शरद जगताप, अनिल चव्हाण, महेंद्र गविरी, मयुर चिपळेकर, प्रितम तांबडे, संग्राम किचेवाड, मल्हारी साकत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल परिसरात विविध उपक्रम राबविण्यात आले.



**पनवेल : महापालिकेच्या नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या वाढदिवसानिमित्त प्रभाग क्रमांक १९मध्ये वायफाय सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेचा शुभारंभ भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आला. या वेळी महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, स्थायी समिती सभापती ॲड. नरेश ठाकूर, प्रभाग समिती 'ड'च्या सभापती ॲड. वृषाली वाघमारे, भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, शहर अध्यक्ष जयंत पगडे, भाजप नेते नंदू पटवर्धन, नगरसेवक राजू सोनी, मुकीद काझी, नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, रूचिता लोंढे आदी उपस्थित होते.**

# मोरा जेट्टीच्या शौचालयाची दुरवस्था

## प्रवाशांची गैरसोय; लक्ष देण्याची मेरी टाईम बोर्डाकडे मागणी

**उरण : प्रतिनिधी**

उरण येथील मोरा जेट्टीच्या शौचालयाची ही मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे, मात्र त्याकडे मेरी टाईम बोर्डचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने प्रवाशामध्ये वर्गात नाराजीचा सूर उमटत आहे. मेरीटाइम बोर्डने या समस्यानकडे जातीने लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवासी विशेष करून महिला वर्ग करीत आहे.



मुंबई व घारापुरी बेटावर जाण्यासाठी मोरा जेटीचा वापर सर्रास प्रवाशी नागरीक करत आहेत. येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांसाठी मोरा जेटीवर मेरिटाइम बोर्ड मार्फत ज्या सुख सोयी असायला हव्या आहेत. त्या दिल्या जात नाहीत. विशेष म्हणजे मुख्य गोष्ट शौचालय चांगल्या प्रकारे असायला आहे, परंतु मोरा जेटीवर असे काहीच दिसत नाही. मोरा ते भाऊचा धक्का प्रवासात विशेष करून ५० टक्के महिला वर्ग प्रवास करीत आहेत, मात्र जेटीवर शौचालय ची दुरवस्था झाली असून दरवाजे ही मोडक्या अवस्थेत आहेत. यामुळे विशेष म्हणजे महिला वर्गाला याचा खूप त्रास सहन करावा लागत आहे. लवकरात लवकर या समस्येकडे लक्ष द्यावे, अशी मागणी महिला वर्ग करीत आहेत.

> **मोरा जेटीच्या दुरुस्तीचे टेंडर मेरिटाईम बोर्डाने काढले आहे. लवकरच दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करून प्रवाशांची गैरसोय दूर केली जाईल.**
> **-पी. बी. पवार, बंदर निरीक्षक, मोरा, उरण**

# पनवेलमधील बाजारात आरोग्यवर्धक 'शेवळ' दाखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेवळ ही रानभाजी पनवेलसह जिल्ह्यात काही ठिकाणी लवकरच दाखल झाली आहे. त्यामुळे खवैये खुश आहेत, अतिशय सकस व रुचकर असलेल्या या रानभाजीला खुप मागणी आहे. मागील वर्षी २० रुपयांनी मिळणारी एक जुडी आता तब्बल ३० रुपयांना मिळत आहे. अनेक आदिवासींना ही भाजी विकून दोन पैसे हाती मिळत आहेत.

ही भाजी दाखल झाल्याने पावसाच्या आगमनाची चाहूल लागली आहे. काही ठिकाणी मान्सूनपूर्व पर्जन्य पडल्यामुळे डोंगर भागात शेवळ उगवली आहेत. त्यामुळे उन्हाळ्यात ही भाजी बाजारात दिसत आहे. हि भाजी तयार करण्यासाठी बोंडग्याचा पाला देखिल लागतो. कारण या पाल्यामुळे भाजी खातांना खवखवत नाही. त्यामुळे आदिवासी महिला शेवळ्या बरोबरच बोंडग्याचा पाला देखील जुडी सोबत ठेवतात. सध्या तीस रुपयांना शेवळ्याची जुडी मिळत आहे. पावसाळा सुरू झाल्यावर हा भाव कमी होऊन १५ ते २० रुपयांना जुडी मिळेल.



**अशी बनवा शेवळ्याची भाजी**

आधी भाजी निट धुवून स्वच्छ करून घ्यावी. त्याबरोबरच बोंडग्याचा पाला देखील स्वच्छ धुवावा. त्यानंतर भाजी नीट बारीक चिरुन घ्यावी. त्यातील खवखणारा भाग काढून टाकावा, कांद्या मसाल्यावर तेलात परतून घ्यावी. किंवा थपथपीत (जाड) रस्सा करावा. भाजीत चिंच, कैरी, आंबोशी किंवा कोकम घालावे त्यामुळे भाजी खवखवत नाही व चविष्ट लागते. आणि गरम गरम चपाती किंवा भाकरी सोबत खावी.

> **ही भाजी खाण्यास खुपच चविष्ट असते, तसेच आरोग्यासदेखील उत्तम असते. घरात आवर्जून ही भाजी बनवितो. घरातील मंडळी ती अतिशय चविने खातात. सध्या बाजारात लवकरच शेवळ उपलब्ध झाल्याने खुप आनंद होत आहे.**
> **-धर्मिबाई अडसुले, गृहिणी**

# डिलीट करायला शिका

आपण आपल्याकडे असलेला मोबाइल सतत हँग मारत असेल तर आपण त्याला सुरळीत चालण्यासाठी त्यातील नको असलेले ॲप्स, फोटो, व्हिडीओ आणि इतर गोष्टी डिलीट करत असतो. त्यामुळे हँग मारत असलेला मोबाइल त्यानंतर व्यवस्थितपणे काम करतो. अगदी मानवी आयुष्याचे सुद्धा असेच आहे. काही गोष्टी आयुष्याच्या डायरीत अशारीतीने जमा होत जातात की मग त्यांना डिलीट करणे बऱ्याचदा कठीण होऊन जात, पण त्या आयुष्यात तशाच जमा राहिल्या तर आयुष्य सुद्धा हँग मारायला सुरुवात होते. त्यामुळे काही गोष्टी माणसाला स्वतःहून डिलीट करता आल्या पाहिजे आयुष्य सुरळीत चालण्यासाठी.



माणूस म्हटले की चांगल्या-वाईट सवयी येतातच. आयुष्यात आपण कधी कधी चांगले काम करण्यासाठी नकळत चुकीच्या मार्गाचा वापर केला जातो. परंतु आपल्याला नेहमीसाठी अशा चुकीच्या मार्गाची सवय झाली की मग त्या आपल्यासाठी धोकादायक ठरत असतात. कारण प्रमाण वाढले की परिणामही वाढतात. त्यामुळे आयुष्य समाधानाने जगायचे असेल तर आपल्या वाईट सवयींना वेळेआधीच पूर्णपणे डिलीट करणे अत्यंत आवश्यक आहे. काही वाईट हे नेहमीच वाईट असते आणि घातक सुद्धा.

काही सवयी, काही माणसं, काही आठवणी, काही घटना यांना आपण कितीही विसरण्याचा प्रयत्न केला तरीही आपण त्यांना पूर्णपणे विसरून जाण्याच्या मनस्थितीमध्ये बऱ्याचदा नसतो. त्यामुळे कुठेना कुठे त्या व्यक्तीची आठवण, त्या घटना, त्या सवयी आपल्या आयुष्यावर परिणाम करत असतात. कारणे डोळ्यासमोर असतात, परिणामही माहिती असतात पण प्रत्यक्ष आपल्याला जे करायला पाहिजे तेच करत नाही. त्यामुळे आयुष्य नावाच्या गाडीचा वेग कमी होऊन बऱ्याचदा आयुष्याचा प्रवासही थांबतो. त्यामुळे आपल्यावर परिणाम करणाऱ्या सवयी, माणसं, आठवणी, घटना सुद्धा डिलीट करता आल्या पाहिजे.

ग्लास पाण्याने पूर्णपणे भरला असेल आणि पुन्हा आपण त्यात पाणी टाकण्याचा प्रयत्न करणार तर पाणी खाली पडणारच. अगदी तसच आपले सुद्धा. मानवी यंत्राची सुद्धा एक लिमिट असते. जोपर्यत भरलेले संपत नाही तोपर्यंत त्यामध्ये दुसरे काही जमा करू नये. कारण त्यासाठी तिथे जागा नसतेच. म्हणून आयुष्यात काही नवीन गोष्टी सेव्ह करायच्या असतील तर त्याआधी जुन्या आणि अनावश्यक गोष्टी डिलीट करणे तितकेच आवश्यक आहे. कारण जागा रिकामी असेल तर त्यात काहीही पुन्हा भरता येत पण जागा आधीच भरलेली असेल तर पुन्हा त्यात काही भरता येत नाही, म्हणून स्पेस हवीच.

आयुष्यात काही गोष्टी गरज असतांना आठवत नाही आणि काही गोष्टी गरज असतांना आपण विसरत नाही. म्हणून बरेच प्रश्न उपस्थित होतात. आयुष्यातील बऱ्याच समस्यांचे मुळ कारण हेच असते की आपण काही गोष्टींमध्ये गुंतून जास्त वेळ असतो. काही गोष्टी मनाच्या मेमोरीमध्ये ठासून भरत जातो. त्यामुळे आयुष्याच्या परीक्षेतील प्रश्न काही सुटत नाही आणि त्याची उत्तरे सुद्धा भेटत नाही. त्यामुळे सेव्ह जेवढ्या आवडीने करतो त्याच आवडीने डिलीट करणे सुद्धा जमले पाहिजे. कारण आयुष्यात डिलीट करणे जमले की आयुष्यातील बरेच प्रश्न सुटत जातात. पुढे आयुष्याच्या प्रवासात वेगवेगळे मार्ग भेटत जातात आणि आयुष्य नावाचा प्रवास अगदी सुंदर बनत जातो.

**-सुरज पि. दहागावकर, चंद्रपूर**

## संपादकीय

# वेळकाढू कारस्थान

महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक अशा महत्त्वाच्या महापालिकांबरोबरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे घोंगडे केवळ ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावरून भिजत पडले होते असे मानले जाते. वास्तविक या निवडणुका लागलीच जाहीर झाल्या तर आपली धुळदाण उडेल याची खात्रीच असल्यामुळे सत्ताधारी महाविकास आघाडीला निवडणुकांमध्ये रस नव्हता. अजुनही सत्तेत असलेले तिन्ही पक्ष निवडणुकांसाठी तयार आहेत असे नाही. मध्यप्रदेशात मात्र अशाच निवडणुका ओबीसी आरक्षणासह घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे महाराष्ट्रात आरोप प्रत्यारोपांचा धुरळा उडाला आहे.

**खरे तर आठवडाभरापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींसंदर्भातील इम्पेरिकल डेटा अपुरा असल्याचे कारण देत या निवडणुका ओबीसी आरक्षणाविना घेण्याचा निर्णय दिला होता. परंतु त्यानंतरच्या आठवड्यात मध्य प्रदेश सरकारने तातडीने पावले उचलत सुधारित अहवाल न्यायालयात सादर केला. महाराष्ट्र सरकार मात्र हातावर हात बांधून बसून राहिले. महाराष्ट्र सरकारला न्यायालयाने लगावलेली ही सणसणीत चपराक आहे. एकीकडे नाकर्तेपणाचा आरोप आणि दुसरीकडे निवडणुका नको असल्याने केलेली दिरंगाई असा हेत्वारोप अशा दुहेरी टीकेला आता महाविकास आघाडीला तोंड द्यावे लागते आहे. महाराष्ट्रात या एकूण आरक्षणाची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. खरे तर १९९४पासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना आरक्षण देण्यात आले होते. परंतु मार्च २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हे आरक्षण रद्दबातल ठरवत जिल्हा परिषदा आणि अन्य स्थानिक निवडणुका आरक्षणाविना घेण्याचे आदेश दिले. तेव्हापासून हा प्रश्न ऐरणीवर आणला गेला. ओबीसींना आरक्षण मिळावे असे मुळातच महाविकास आघाडीतील कुठल्याच पक्षाला खरे तर वाटत नाही. तरीही राजकारणाची गरज म्हणून त्यांना काहीतरी करून दाखवल्यासारखे करावे लागते. ओबीसी आरक्षणाबाबत प्रामाणिक आणि परिपक्व भूमिका फक्त भारतीय जनता पक्षाने घेतली हे अनेक उदाहरणांसह दाखवता येईल. मुख्यमंत्री पदी देवेंद्र फडणवीस असताना हा प्रश्न जवळपास धसाला लागला होता. परंतु त्यानंतर अचानक राजकीय पटावर अदलाबदल झाली आणि महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा टांगून ठेवला गेला. विद्यमान सरकारला कुठलीच न्यायालयीन लढाई व्यवस्थित लढता आलेली नाही हे आजवर अनेकदा दिसून आलेले आहे. मुळात आरक्षण द्यायचेच नसल्याने वेळकाढूपणा करून हा मुद्दाच नष्ट करण्याची चाल महाविकास आघाडीच्या नेत्यांची दिसून आली. अर्थात विरोधीपक्ष नेतेपदी देवेंद्र फडणवीस आणि त्यांचे आक्रमक सहकारी दक्ष राहिल्याने महाविकास आघाडीच्या नेत्यांचे कारस्थान पूर्णत: तडीला गेले नाही. अर्थात सरकारच्या नाकर्तेपणामुळे ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्याचे व्हायचे ते नुकसान झालेच आहे. दोन वर्षे नुसता वेळकाढूपणा करून आणि केंद्र सरकारकडे वेळोवेळी बोट दाखवून महाविकास आघाडीच्या नेत्यांनी नामानिराळे राहण्याचा प्रयत्न तेवढा केला. निष्कारण मोर्चे काढणे, आंदोलने छेडणे असले उद्योग करण्याऐवजी सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असती तर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा निश्चितच मार्गी लागला असता. राजकारणाच्या वेळी राजकारण करावे, संवेदनशील आणि जनहिताच्या मुद्द्यांवर उथळ राजकारण करू नये एवढे भान तरी महाविकास आघाडीने ठेवायला हवे होते. दुर्दैवाने ते त्यांच्या स्वभावातच नाही असे म्हणावे लागते. जे मध्य प्रदेश सरकारला जमले ते महाराष्ट्राच्या सरकारला का जमू नये असा प्रश्न येत्या काळात नक्कीच विचारला जाईल.**

# रायगड जिल्ह्यातील शेतीक्षेत्रात होतेय घट

**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर



भाताचे कोठार म्हणून ओळखल्या जाणारा रायगड जिल्हा आता औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जातोय. वाढते औद्योगिकरण, नागरीकरण, खारेपाणी जमीन नापिक होणे, नैसर्गिक आपत्ती यामुळे रायगड जिल्ह्यातील शेतीक्षेत्रात मोठी घट झाली आहे. पाच वर्षात भात लागवडीखालील क्षेत्र १५ हजार हेक्टरने तर नाचणी क्षेत्र दोन हजार हेक्टरने घटले आहे. औद्योगिकरणामुळे रोजगाराची संधी मिळते, परंतु त्याचे इतरही काही परिणाम दिसून येतात. यापैकी एक म्हणजे शेतीक्षेत्र कमी होणे होय.

रायगड जिल्ह्यात औद्योगिकरणाचे वारे वाहत आहेत. जिल्ह्यात पाताळगंगा, रोहा, महाड, विळे भागाड, उसर यासारख्या औद्योगिक वसाहती आहेत. खालापूर, वडखळ, अलिबाग येथे एमआयडीसीचे नवे प्रकल्प प्रस्तावित आहेत. तसेच दिघी पोर्ट, दिल्ली मुंबई कॉरीडोर, बल्क ड्रग फार्मापार्क सारखे प्रकल्प जिल्ह्यात येऊ घातले आहेत. नवीमुंबई विमानतळ प्रकल्पही जिल्ह्यात विकसित केले जात आहेत. या प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणात भूसंपादन केले जात आहे. औद्योगिकरण झाल्यामुळे नागरीकरण देखील वेगाने होऊ लागले आहे. त्याचा दुष्परिणाम असा होतोय की, जिल्ह्यातील शेतीक्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट होण्यास सुरुवात झाली आहे. मागील पाच वर्षात शेतीक्षेत्र वेगाने घटत असल्याचे दिसून येत आहे.

पूर्वी बांधबंदिस्ती होत होती. त्यामुळे उधानाचे पाणी अडविले जात होते. मात्र गेले कित्येक वर्षे जिल्ह्यात बांधबंदिस्ती झालेली नाही. बांधबंदिस्ती होत नसल्यामुळे अनेकठिकाणी बांध फुटून समुद्राचे खारे पाणी थेट समुद्रात घसून शेतजमीन नापिक बनली आहे. त्यामुळे देखील शेतीक्षेत्र घटत चालले आहे.

२०15 पर्यंत १ लाख ९ हजार हेक्टर शेतीक्षेत्र होते. गेल्या पाच वर्षात यात अजून मोठी घट झाल्याचे दिसून येत आहे. २०१७-१८ मध्ये जिल्ह्यात १ लाख ९ हजार २०० हेक्टर वर भातपिकाचे लागवडी खालील क्षेत्र होते. २०२०-२१ मध्ये हे क्षेत्र घटून ९४ हजार ४३५ हेक्टरवर आले आहे. तर नाचणी लागवडी खालील क्षेत्र २०१७-१८ साली ५ हजार ६३३ हेक्टर होते. ते २०२०-२१ मध्ये ३ हजार ६४० हेक्टरवर आले आहे.



| सन | भात लागवडीचे क्षेत्र |
|---|---|
| २०१७-१८ | १ लाख ९ हजार हेक्टर |
| २०१८-१९ | १ लाख ११ हजार हेक्टर |
| २०१९-२० | ९५ हजार ९०० हेक्टर |
| २०२०-२१ | ९४ हजार ५०० हेक्टर |
| २०२१-२२ | ९४ हजार ४३५ हेक्टर |

जिल्ह्यात १ लाख हेक्टर शेतजमिनीपैकी केवळ ७ हजार १६५ हेक्टर सिंचन क्षेत्र आहे. यातील २ हजार ९८८ हेक्टर क्षेत्र हे विहीरींच्या पाण्यावर सिंचन केले जाते. तर ४ हजार १७७ हेक्टर क्षेत्र हे इतर धरणे, कालवे आणि इतर साधनांनी सिंचन केले जाते. त्यामुळे बहुतांश शेती ही खरीपाच्या लागवडीवर अवलंबून आहे. सिंचन नसल्यामुळे शेती करणे परवडत नाही. त्यामुळे शेती पडीक राहून ती नापिक बनते. औद्योगिकरण झाल्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे तरुण वर्ग शेतीकडे वळत नाही. शेतावर काम करण्यासाठी मजूर मिळत नाहीत. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी शेती करणे बंद केले आहे.


रायगड जिल्ह्यात शेती लागवड क्षेत्रात घट होत आहे ही वस्तुस्थिती आहे. पण त्याच वेळी उत्पादकता मात्र वाढ आहे. भाताची प्रति हेक्टर उत्पादकता वाढत आहे. २०१७ – २०१८ साली हेक्टरी २६२२ किलो भाताची उत्पादकता होती. २०१८-२०१९ साली ती २८०५ किलो झाली होती. २०१९-२०२० मध्ये ती १९९९ किलो झाली. २०२१-२०२२ मध्ये उत्पादकता २३४६ किलो एवढी झाली. उत्पादकता वाढतेय ही चांगली बाब आहे. नाचणीच्या उत्पादनात प्रति हेक्टर ९४८ किलो वरून १३०७ वर गेली आहे.

रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली पाहिजे. सगुणा भात लागवड तंत्रज्ञान, ड्रमसिडर याव्दारे तसेच यंत्राव्दारे लागवड केली पाहिजे. त्यामुळे मनुष्यबळ कमी लागेल त्याचबरोबर उत्पादकता देखील वाढेल. चारसुत्री लागवढ पध्दतीने भाताची लागवड केल्यास उत्पादकता वाढते. त्याचबरोबर सुधारीत जातींची बियाणे वापरली पाहिजेत. शासन शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहे. विविध योजना राबवत आहे. त्याला काही प्रमाणत यश येत आहे.

दरवर्षी शेतीच्या लागवड क्षेत्रात घट होत आहे असे असले तरी शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन उत्पादकता वाढवता येते. केवळ शेतीक्षेत्र घटतेय म्हणून गप्प बसून चालणार नाही. रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शेतीक्षेत्र वाचविले पाहिजे. त्याचबरोबर उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न केले पहिजेत. भात शेतीबरोबर इतरही पिके घेतली पाहिजेत.

## बदलते तंत्रज्ञान







# प्ले स्टोअरवरुन नऊ लाख ॲप्स जाणार

काही दिवसांपूर्वी गुगलने काही ॲप्सवर बंदी घातली होती. आता गुगल जवळपास नऊ लाख ॲप्स काढून टाकण्याचा विचार करत आहे. आज आपण गुगलच्या या निर्णयाबाबत सविस्तर माहिती जाणून घेवूया. काही दिवसांपूर्वी गुगलने काही ॲप्सवर बंदी घातली होती. आता गुगल जवळपास नऊ लाख ॲप्स काढून टाकण्याचा विचार करत आहे. यापैकी काही ॲप्स तुम्ही डाउनलोड केलेले असतील. त्यामुळे थोडे सावध राहा, कारण युजर्सच्या सुरक्षेसाठी कंपनीला असा निर्णय घ्यावा लागला आहे. आज आपण गुगलच्या या निर्णयाबाबत सर्विस्तर माहिती जाणून घेवूया. जे ॲप्स त्यांचे अपडेट्स जाहीर करत नाहीत, अशा नऊ लाख ॲप्सना गुगल, प्ले स्टोअरवरून काढून टाकण्याच्या तयारीत आहे. अँड्रॉइड ऑथॉरिटीच्या म्हणण्यानुसार, असे केल्याने गुगल ॲप स्टोअरवरील ॲप्सची संख्या एक तृतीयांश कमी होईल. यापूर्वी, ॲपलने देखील आपल्या प्ले स्टोरवरून असे ॲप्स काढून टाकण्याचा निर्णय घेतला होता, ज्यांनी गेल्या दोन वर्षांपासून कोणतेही अपडेट जारी केले नव्हते. ॲपलनेही त्या सर्व ॲप निर्मात्यांना ईमेल पाठवून याची माहिती दिली होती. सिनेटच्या म्हणण्यानुसार, गुगल आणि ॲपल त्यांच्या वापरकर्त्यांच्या संरक्षणासाठी ही पावले उचलत आहेत. गुगल ते ॲप्स आपल्या प्लेस्टोअरवरून हाईड करेल, ज्यांचे अपडेट रिलीझ झालेले नाहीत. यामुळे वापरकर्ते ते ॲप्स डाउनलोड करु शकणार नाहीत. अहवालानुसार, हे जुने ॲप्स अँड्रॉइड आणि आयओएसमधील बदल, नवीन एपीआय आणि सुरक्षा वाढविण्यासाठी नवीन पद्धतींचा फायदा घेत नाहीत. या कारणास्तव, जुने ॲप्स सुरक्षिततेच्या दृष्टीने असुरक्षित आहेत. मात्र, नवीन ॲप्समध्ये ही कमतरता नाही, असे कंपनीचे म्हणणे आहे.

# मराठी गद्याचे जनक विष्णुशास्त्री चिपळूणकर

**निमित्त**



विष्णुशास्त्री हे 'आधुनिक मराठी गद्याचे जनक' म्हणून ओळखले जाणारे श्रेष्ठ मराठी ग्रंथकार होय. त्यांच्या अगोदर आधुनिक मराठी गद्य जवळजवळ अर्ध्या शतकाहून अधिक काळ निर्माण होत होते. परंतु त्यांनी त्याला अधिक प्रभावी स्वरुप प्राप्त करून दिले. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा जन्म २० मे १८५० रोजी पुणे येथे झाला. मुंबई विद्यापीठाची बी.ए.ची परीक्षा पुण्याच्या डेक्कन महाविद्यालयातून ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर पुणे व रत्नागिरी येथील सरकारी माध्यमिक शाळांतून त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. विष्णुशास्त्री यांचे वडील कृष्णशास्त्री हे संस्कृततज्ञ होते. इंग्रजी साहित्याचे जाणकार, रसिक, विद्वान आणि चतुरस्त्र मराठी लेखक असल्यामुळे विष्णुशास्त्री यांनाही लेखनवाचनाची गोडी लागली.

शालापत्रक या मासिकातून विष्णुशास्त्री यांच्या लेखनाचा आरंभ झाला. त्यानंतर काही वर्षांतच ते या मासिकाचे संपादकही झाले. तथापि त्यांच्या संपादकीय कारकीर्दीत शालापत्रकातून सरकार व ख्रिस्ती मिशनरी यांच्यावर त्यांनी केलेल्या टिकेचा गवगवा होऊन शालापत्रक बंद पडले. सरकारी नोकरीत असतानाच त्यांनी निबंधमाला, हे सुप्रसिद्ध मासिक काढले. तसेच ज. बा. मोडक आणि का. ना. साने यांच्या सहकार्याने काव्येतिहाससंग्रह हे मासिक सुरू केले. आपल्या देशातील लोकांनी रचलेली काव्ये, लिहिलेले इतिहास, बखरी असे साहित्य प्रसिद्ध करून त्यामार्गे देशसेवा करणे, हा हे मासिक काढण्यामागील मुख्य हेतू होता. तथापि या मासिकावर विष्णुशास्त्री यांनी संपादक म्हणून आपले नाव लिहिले नव्हते. इंग्रजी शिकताना मराठी सोडू नये, असे त्यांचे म्हणणे होते. निबंधमाला हे विष्णुशास्त्री यांचे प्रमुख कार्य होते. निबंधमालेच्या सात वर्षांच्या कारकीर्दीत निघालेल्या सर्वच्या सर्व म्हणजे ८४ अंकांतील लेखन विष्णुशास्त्री यांनी जवळजवळ एकटाकी केले. निबंधमालेत विविध विषयांवर लिहिलेल्या त्यांच्या निबंधांनी मराठी निबंधाला सामर्थ्य दिले आणि त्याच्या विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा गाठला.

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी सुरू केलेले सॅम्युएल जॉन्सनच्या रासेलस या ग्रंथाचे भाषांतर विष्णुशास्त्रीनीच शालापत्रकातून क्रमशः पूर्ण केले. याच मासिकातून कालिदास, भवभूती, बाण, सुबंधू आणि दंडी या संस्कृत कवींवर त्यांनी जे समिक्षात्मक निबंध लिहिले, ते पुढे संस्कृत कविपंचक या नावाने प्रसिद्ध झाले.

शालापत्रक, निबंधमाला, केसरी इ. नियतकालिकांतून विष्णुशास्त्री यांनी जे लेखन केले ते भाषा साहित्यविषयक, सामाजिक, राजकीय असे विविध प्रकारचे आहे. त्यांच्या भाषा साहित्यविषयक लेखांत मराठी भाषेची तत्कालीन स्थिती, भाषापद्धती, परभाषेतील शब्दांची योजना, इंग्रजी भाषा, कविता, विद्वत्व आणि कवित्व, ग्रंथांवरील टिका वगैरे विषयांवरील लेखन अंतर्भूत आहे. लोकभ्रम, अनुकरण, गर्व यासारखे विषय त्यांच्या सामाजिक लेखनात आलेले आहेत. 'आमच्या देशाची स्थिती' आणि 'मुद्रणस्वातंत्र्य हे दोन लेख त्यांच्या राजकीय लेखनापैकी विशेष उल्लेखनीय होते. स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा याविषयीचा अभिमान ही त्यांच्या लेखनामागील प्रेरणा होती. या तिन्ही संदर्भांत सामान्यतः उदासीन असलेल्या आणि इंग्रजी राजवटीच्या आहारी जाऊन स्वतःचा देश, त्याने दिलेला सांस्कृतिक वारसा आणि परंपरा यांना कमी लेखणाऱ्या तत्कालीन सुशिक्षितांना चेतावणी देणे हा त्यांच्या लेखनामागील एक प्रमुख हेतू होता. १७ मार्च १८८२ रोजी पुणे येथे विष्णुशास्त्री यांचे निधन झाले.



**क्लिक...क्लिक...!** मुरुड : समुद्र किनारी आणि त्यात लाटांमध्ये खेळतानाचा आनंद काही वेगळाच असतो. मुरुड समुद किनारी असाच हा आनंद घेताना काही पर्यटक दिसत आहेत. (छाया: सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# खवय्यानो थंड पदार्थ खात आहात सावधान!

उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये काहीतरी थंड खाण्याची इच्छा होणे स्वाभाविक आहे. पण थंड आइस्क्रीम किंवा अन्य काही खाल्ल्यास मेंदूला झिणझिण्या येतात. पण यात गंभीर असे काहीच नसते. आराम न करता किंवा कोणतेही औषध न घेता बरे वाटते. बरे होण्यासाठी सर्वांत चांगला उपाय म्हणजे गळा आणि तोंडाचे तापमान सामान्य ठेवण्याचा प्रयत्न करा.

थंड खाल्ल्यानंतर डोक्यात प्रचंड वेदना सुरू होतात. किती प्रमाणात थंड पदार्थ खाल्ला आहे यावर या वेदनांचा कालावधी अवलंबून असतो. इतर प्रकारच्या डोकेदुखीच्या तुलनेत ब्रेन फ्रीजची सुरुवात लवकर होते. सोबत मायग्रेन असेल तर त्या व्यक्तीला पोटदुखी आणि मळमळीचा त्रासही होऊ शकतो. मोठा आवाज किंवा प्रखर प्रकाशामध्ये ही डोकेदुखी अधिक जाणवते.

याची कारणे याप्रमाणे आहेत–जेव्हा तुम्ही एखाद्या थंड पदार्थाचा घोट किंवा घास तोंडात घेता तेव्हा तुमच्या टाळूचा भाग सामान्य तापमानापेक्षा अधिक थंड होतो. तोंड पुन्हा गरम करण्यासाठी मस्तिष्कामधून रक्त पाठविले जाते. जास्त रक्त पाठविण्यासाठी भोवतालच्या रक्तवाहिन्या आकुंचन पावतात आणि पुन्हा वेगाने उघडतात. त्यामुळे वेदना होतात.

यावर उपाय असे– गरम पाणी प्या. थंड पदार्थ खाणे–पिणे बंद करावे. खूप गरम आणि खूप थंड पदार्थ खाऊ नयेत. टाळूला अंगठ्याने किंवा जीभेने स्पर्श करावा. थंड पदार्थ थोडा–थोडा खा किंवा प्या. खाण्याआधी जेवण गरम करा. थंड हवा तोंडात जाऊ नये यासाठी तोंड कापडाने किंवा मास्कने बांधून घ्या. तसेच काही गोष्टी खाल्ल्याने पोटदुखी होते हे आपल्याला माहिती आहे पण काही पदार्थ असे असतात, जे खाल्ल्याने डोकेदुखी होते. जर तुम्हाला मायग्रेन असेल तर तुम्ही या पदार्थांकडे तर विशेष लक्ष द्यायला हवे. यामध्ये खूप जास्त कॅफिन सेवनाने किंवा अचानक कॅफिन बंद केल्याने डोकेदुखी उद्भवते. कॉफी, चहा आणि चॉकलेटमधील कॅफिनमुळेच या पदार्थांच्या अतिसेवनाने डोकेदुखी होते. साखरेऐवजी वापरण्यात येणारे कृत्रिम गोडवा देणारे स्वीटनर अनेकांसाठी डोकेदुखीचे कारण बनतात. दारुच्या अतिसेवनाने शरीरात डिहायड्रेशन होऊ शकते. रेड वाइन आणि बियर पिणारे २५ टक्के लोक डोकेदुखीची तक्रार करतात. चॉकलेट्स खाण्याचे डोकेदुखी होऊ शकते. बहुतांश चॉकलेट्समध्ये कोकोची मात्रा कमी असते आणि टायरामीन, कॅफिन असते. यामुळे मायग्रेन पीडितांना डोकेदुखीचा त्रास उद्भवतो. येता जाता शेंगदाणे तोंडात टाकण्याची अनेकांना सवय असते. मात्र खूप जास्त शेंगदाणे एकावेळी खाल्ल्यास त्यातील टायरामीन आपले डोके दुखवते. यासाठी याबाबींकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

# खालापुरात बांधबंदिस्ती कामाला वेग

**खोपोली : प्रतिनिधी**

जिल्हा वार्षिक विकास योजना (डीपीडीसी) सन २०२१-२२ अंतर्गत खालापूर तालुक्यातील दहा गावांमध्ये कृषी विभागाकडून बांधबंदिस्तीच्या कामाला सुरुवात झाली आहे.

दरवर्षी पावसाळ्या अगोदर जिल्हा वार्षिक निधीतून खालापूर तालुक्यात बांधबंदिस्तीची काम करण्यात येतात. यंदा तालुक्यातील कोपरी, तुपगांव, पाली खुर्द, आसरोटी, माजगाव, आंबिवली, वारद, तळवली, वडगाव आणि टेंभरी या गावांमध्ये बांधबंदिस्तीच्या कामाला सुरुवात झाली आहे. सुमारे ३६०हेक्टर (९०० एकर) क्षेत्रात बांधबंदिस्तीची कामे होणार आहेत. बांधबंदिस्तीच्या कामामुळे शेती समतल होत असून जमिनीचा पोत वाढणार आहे. त्याचा फायदा भातशेतीला होणार आहे. कृषी विभागाकडून मिळणाऱ्या या योजनेमुळे शेतकरी सुखावले असून पावसाळ्यापुर्वी बांधबंदिस्ती झाल्यामुळे शेतीच्या कामाला वेग येणार आहे.



(छाया : विनायक माडपे)

**कोरोनामुळे शेतकरी दोन वर्षे आर्थिक संकटाचा सामना करीत होते. कृषी विभागाकडून मोफत बांधबंदिस्ती करून मिळाल्याने आर्थिक भार कमी झाला आहे.**

**-योगेश गुरव, शेतकरी, तुपगाव, ता. खालापूर**

**जिल्हा वार्षिक विकास योजनेअंतर्गत दरवर्षी खालापूर तालुक्यातील गावांची बांधबंदिस्तीसाठी निवड केली जाते. यंदा १० गावांमध्ये बांधबंदिस्तीची कामे सुरू आहेत.**

**-अर्चना सूळ-नारनवार, तालुका कृषी अधिकारी, खालापूर**

# बिबट्याच्या हल्ल्यात बैलाचा मृत्यू

## माथेरानच्या पायथ्याशी टाकाचीवाडी येथील घटना

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील भडवळ टाकाचीवाडी येथील जंगलात बिबट्याने केलेल्या हल्ल्यात एका बैलाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे या जंगलात बिबट्याचा वावर असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, वन विभागाने त्या शेतकऱ्याला आर्थिक मदत व्हावी यासाठीचा अहवाल वरिष्ठ कार्यालयाला पाठवला आहे.

भडवळ टाकाचीवाडी येथील आदिवासी शेतकरी हिरु धर्मा शिंगवा यांच्या मालकीचा बैल २मे रोजी सायंकाळी ममदापुरवाडी भागातील जंगलात चरायला गेला होता. बैल घरी आला नाही म्हणून शिंगवा यांनी शोधाशोध केली असता तो बैल जखमी अवस्थेत जंगलात सापडला. या बैलाची चिंचवली येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सलगर यांनी तपासणी केली. त्यावेळी त्या बैलावर बिबट्याने हल्ला केला असल्याचे डॉ. सलगर यांनी स्पष्ट केले. मात्र उपचार सुरु करण्याआधीच त्या बैलाचा मृत्यू झाला होता.



माथेरान वन क्षेत्रातील नेरळ वन परिघाचे वनपाल एस. एच. म्हात्रे यांनी मृत बैलाचे मालक हिरु धर्मा शिंगवा यांना आर्थिक मदत मिळावी यासाठी प्रस्ताव तयार केला आहे. या घटनेमुळे माथेरानच्या पायथ्याशी असलेल्या टाकाचीवाडी, ममदापुरवाडी भागात बिबट्याचा वावर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. त्यामुळे स्थानिक आदिवासींनी आपल्या पशूंची काळजी घ्यावी, अशा सूचना वन विभागाने केल्या आहेत.

# ड्रेजर बोटीमुळे मुरूडमधील मच्छीमार त्रस्त; प्रशासनाचे दुर्लक्ष



**मुरूड : प्रतिनिधी**

दिघी बंदरात मालवाहू जहाजे येण्यासाठी एका चॅनेलची निर्मिती करण्यात येत आहे. त्यासाठी महाकाय बोटीद्वारे समुद्रातून काढलेला चिखल व गाळ हा पद्मदुर्ग किल्ल्याच्या परिसरातच टाकण्यात येत आहे. त्याचा त्रास स्थानिक मच्छीमारांना सहन करावा लागत आहे.

मुरूड तालुक्यातील दिघी येथे आंतरराष्ट्रीय बंदर विकसित करण्यात येत आहे. त्यासाठी आगरदांडा व दिघी परिसरातील १६०० एकर जमीन संपादीत करण्यात आली आहे. या बंदरात मोठमोठी मालवाहू जहाजे येण्यासाठी चॅनेलची निर्मिती करण्यात येत आहे. त्यासाठी दीड महिन्यापासून महाकाय ड्रेजर बोटीद्वारे समुद्रातील चिखल व गाळ काढून सदरचा मार्ग खोलगट करण्यात येत आहे. मात्र समुद्रातून काढलेला हा चिखल व गाळ पद्मदुर्ग किल्ल्याच्या परिसरातच टाकण्यात येत आहे.

आगरदांडा, दिघी, एकदरा, मुरूड या परिसरातील लोक राजपुरी खाडीत मोठ्या प्रमाणात मच्छीमारी करतात. त्यांना पद्मदुर्ग किल्ल्याच्या परिसरात टाकण्यात येणाऱ्या चिखल व गाळाचा त्रास सहन करावा आहे. स्थानिक मच्छीमारांच्या जाळ्यात मासळी न सापडता चिखल व गाळ येत आहे. त्यामुळे या परिसरातील मच्छीमारांवर उपासमारीची पाळी आली आहे.

ड्रेजर बोटीने हा भाग अधिक खोल करताना समुद्राच्या तळाशी असणारे विषारी वायू वर आल्यास मासेमारीवर कायमस्वरूपी संकट कोसळणार असल्याची भीती स्थानिक मच्छिमारांनी व्यक्त केली आहे.

**समुद्रातून काढण्यात येणारा गाळ १२ वाव खोल समुद्रात डम्पिंग करणे आवश्यक आहे, ते ड्रेजरच्या कॅप्टनला माहीत नसल्यामुळे सुरुवातीच्या काळात पद्मदुर्ग किल्ल्याच्या आसपास गाळ टाकला गेला. ही बाब १३ गाव कोळी समाज अध्यक्ष ज्ञानेश्वर तांडेल यांनी कंपनी व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर दिघी पोर्ट हा चिखल व गाळ १२ वावच्या बाहेर टाकत आहेत.**

**-पांडुरंग आगरकर, अध्यक्ष, मुरूड तालुका मच्छीमार कृती समिती**

# गिर्यारोहकांसाठी खोपोलीत ड्रोन प्रशिक्षण

**खोपोली : प्रतिनिधी**

यशवंती हायकर्स खोपोली आणि माउंटन स्पोर्ट्स अकादमी (एमएसए) यांच्या संयुक्त विद्यमाने खोपोली येथे एक दिवसीय ड्रोन प्रशिक्षण मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्यात खोपोलीसह महाबळेश्वर, आणि मुंबई येथील २२ गिर्यारोहक सहभागी झाले होते.

बचावकार्य करीत असताना अनेकदा अपघातग्रस्त व्यक्तीचे नेमके ठिकाण शोधण्यापासून सुरुवात करावी लागते. त्यामध्ये गिर्यारोहकांचे श्रम आणि वेळ वाया जातो, त्याचबरोबर अपघातग्रस्त व्यक्तीला मदत पोचवण्यासही वेळ लागतो. या उपाय म्हणजे ड्रोन. ड्रोनच्या सहाय्याने कमीत कमी वेळात अपघातग्रस्त व्यक्तीचे ठिकाण शोधणे शक्य होते. त्यासाठी बचावकार्य करणाऱ्या गिर्यारोहकांना ड्रोन वापरण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन नंदू चव्हाण यांनी यशवंती हायकर्सच्या सहकार्याने खोपोली येथे एक दिवसीय मोफत ड्रोन प्रशिक्षण आयोजित केले होते. ड्रोन प्रशिक्षक ऐश्वर्य बांदिवडेकर यांनी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून अतिशय सोप्या पद्धतीने गिर्यारोहकांना ड्रोनचे प्रशिक्षण दिले. या प्रशिक्षण शिबिरात यशवंती हायकर्स, प्रतापगड सर्च आणि रेस्क्यू टिम, महाबळेश्वर, आणि मुंबई येथील एकूण २२ गिर्यारोहक सहभागी झाले होते.

खोपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शिरीष पवार यांनी प्रशिक्षण शिबिराला भेट देवून आयोजक आणि गिर्यारोहकांचे कौतुक केले व प्रोत्साहन दिले तसेच स्वत: ड्रोन उडवण्याचा अनुभव घेतला.



(छाया : विनायक माडपे)

# इंदापूर-माणगावदरम्यान महिलेच्या बॅगेतील सोन्याचे दागिने चोरून अज्ञात चोरटा पसार

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील इंदापूर एसटी बसस्थानक ते माणगाव एसटी बसस्थानक दरम्यान महिलेच्या बॅगेतील सुमारे दोन लाख ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने चोरून अज्ञात चोरटा पसार झाला आहे.

फिर्यादी महिला अंकिता विलास कडू (वय ४२, सध्या रा. वडाळा, मूळ रा. वाकळधार, ता. श्रीवर्धन) या १४ मे रोजी इंदापूर ते माणगाव असा प्रवास करीत होत्या. दरम्यान महिलेच्या बॅगेतील एकूण सुमारे दोन लाख ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने घेवून अज्ञात चोरटा पसार झाला. या बाबतची तक्रार दिघी सागरी पोलीस ठाणे येथे दाखल करून १८ मे रोजी माणगाव पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. गायकवाड करीत आहेत.

# खोपोली-पेण मार्गावर अपघात; दोघे जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

भरधाव टाटा मॅजिकची दुचाकीला धडक बसून खोपोली-पेण राज्यमार्गावर झालेल्या अपघातात लक्ष्मण दामू सुतक (वय २१, रा. वरसई, ता. पेण) व दिलीप बाळू बांगरे जखमी झाल्याची घटना घडली.

खोपोली-पेण राज्यमार्गावरून लक्ष्मण सुतक आणि दिलीप बांगरे हे दुचाकीने होते. खालापूर तालुक्यातील खिरकींडी गावाच्या हद्दीत उत्तम गॅल्वा कारखान्यासमोर टाटा मॅजिकची धडक दुचाकीला बसली. या अपघातात लक्ष्मण सुतक आणि दिलीप बांगरे जखमी झाले तर दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. अपघातास कारणीभूत असलेल्या टाटा मॅजिक चालका विरुद्ध खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सहाय्यक फौजदार विजय सुर्वे करीत आहेत.

# बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी पालीत भाविकांची मांदियाळी

**पाली : प्रतिनिधी**

संकष्ट चतुर्थीनिमित्त बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी गुरुवारी (दि. १९) पालीत भाविकांची अलोट गर्दी दिसून आली. भाविकांनी सकाळपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या.

कोरोनाची लाट ओसरल्यानंतर धार्मिक स्थळे व पर्यटन स्थळांवर भाविक मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. संकष्टला बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी गुरुवारी गर्दीचा उच्चांक गाठला. भाविक भक्तगणांची कोणतीही गैरसोय होवू नये, त्यांना शिस्तबध्द पध्दतीने रांगेत दर्शन घेता यावे यासाठी देवस्थान तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात आली होती.

संकष्ट चतुर्थीनिमित्त मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. परिसरातील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार, फुल व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले जय्यत तयारीत होते.

**दीड दोन वर्षानंतर मंदिर सुरू झाल्याने बाप्पाच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने येत आहेत. पर्यटकदेखील मोठ्या प्रमाणावर येत आहेत. त्यामुळे व्यवसायदेखील चांगला झाला. लहान मोठ्या व्यवसायिकांना रोजगार निर्माण झाला.**

**-अमित वरंडे, व्यवसायिक, पाली, ता. सुधागड**





(छाया : धम्मशील सावंत)

## वाहतूक कोंडी

**बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांच्या गाड्यांमुळे पालीत वाहतुक कोंडी झाली होती. मात्र पाली पोलीस व बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत होते. दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने पाली पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक नाक्यावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. देवळाच्या शेजारून जाणारी सर्व वाहने भक्तनिवास क्रमांक १ च्या बाजूने वळविण्यात आली होती.**

# पशुपक्षांसाठी जंगलात पाण्याची व्यवस्था

## सुधागड तालुक्यातील फणसवाडी येथील तरुणांचा उपक्रम

**पाली : प्रतिनिधी**

सध्या उष्म्याची काहिली आहे. वाढत्या उष्णतेमुळे पशुपक्ष्यांची पाण्यासाठी वाताहात होतांना दिसत आहे. तसेच पाण्याअभावी अनेक पक्षी मृत्यू पावल्याचे सुधागड तालुक्यातील फणसवाडी येथील तरुणांच्या लक्षात आले. या तरुणांनी पशुपक्ष्यांसाठी जंगलातील झाडांवर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे.

फणसवाडी येथील निखिल शिंगरे, राकेश शिंगरे व रोशन शिंदे या तरुणांनी पाण्याची भांडी झाडावर लावून पशुपक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करण्याचा अनोखा उपक्रम राबविला आहे. हे तरुण पशुपक्ष्यांसाठी गावात व गावाशेजारील जंगलात ठिकठिकाणी जाऊन पाण्याची भांडी झाडाला बांधून त्यामध्ये रोज पाणी ठेवत आहेत. जंगलातील जलसाठे कोरडे पडल्यावर पशुपक्ष्यांना हे पाणी संजीवनी ठरत आहे. चिमणी, कावळे व इतर अनेक पक्षी दाण्यापाण्यासाठी येतात व हे पाणी पितात तसेच तेथे पाण्यात छान डुंबतातदेखील. या उपक्रमाचे सर्व स्थरातून कौतुक होत आहे.





(छाया : धम्मशील सावंत)


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे - नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील शॉप मिळकत श्री. संदीपान शिवाजीराव शेडगे याच्या मालकीची आहे. सदर मिळकत ही मा.न्यायाधिश सहकार न्यायालय रायगड/रत्नागिरी अलिबाग याचे कडील आदेशाप्रमाणे थकीत रक्कम वसूल करण्याकरीता मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग याचे हुकुमानुसार मा. तहसिलदार साहेब पनवेल यानी दि.१३/०५/२०२२ रोजी जाहीर लिलाव केला होता. त्या लिलावामध्ये आमचे अशिल प्रतिक्षा किरण पाटील यानी सर्वोच्च बोली लावुन खरेदीकरण्याकरीता अनामत रक्कम शासन जमा केली आहे. तरी या खालील मिळकतीच्या बाबत अन्य कोणाचाही काही हितसंबध असल्यास खालील पत्यावर संपर्क साधणे करीता हि नोटीस प्रसिध्द करणेत येत आहे. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**शॉपचे वर्णन**

**मौजे -नविन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| शॉप नं. | सोसायटीचे नाव | भुखंड क्रमाक | सेक्टर | क्षेत्र चौ.मी. (बांधीव क्षेत्र) |
|---|---|---|---|---|
| १५ | ओमकार आर्केड को.ऑप. हौ.सो. लि. | २४ | १५अ | २६.९८२ |
| १७ | ओमकार आर्केड को.ऑप. हौ.सो. लि. | २४ | १५अ | २६.९८२ |

सबब वर नमुद शॉप/गाळा मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, ताबा कब्जा, एम.ओ.यु, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क दिनासंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद शॉप चा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :-१९/०५/२०२२

**सही/-**

**अॅड. सचिन बी. कोंडीलकर**

शॉप नं. १४२, म्युनसीपल कॉम्प्लेक्स, जुना भाजी मार्केट जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड.

मो. ९८३३३०६३६१.



## पनवेल महानगरपालिका
## जाहीर सूचना

पनवेल महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्ता धारकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविणेत येते की, आपल्या भोगवट्यातील इमारतीची व भुखंडाचे तपासणी व करमुल्यांकन करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कराधान कलम क्र.१२७, १२८अ, १२९, १२९अ, १३१, १३२ व प्रकरण ८ कराधान नियम ५ ते २० अन्वये सर्व मालमत्तेची मागणी देयके (Bill) तयार झालेली आहेत. तरी देयकांचे वाटप करण्याचे काम सुरू आहे. मागणी देयके वाटप करत असताना काही सोसायटी/मालमत्ता धारक यांनी मागणी देयके स्विकारण्यास नकार देत आहेत. महानगरपालिका क्षेत्रातील बंद मालमत्ता असलेले मालमत्ता धारक किंवा प्रत्यक्ष न स्विकारलेले मालमत्ता धारक किंवा अद्यापपर्यंत बिले प्राप्त न झालेल्या मालमत्ता धारकांनी मालमत्ता कर विभाग मुख्यालयात व प्रभाग समिती कार्यालयात प्रत्यक्ष बिले देण्यासाठी एक खिडकी उघडण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी आपले बिल प्राप्त करून घ्यावे.

पनवेल महानगरपालिकेने Online कर मागणी देयके (Bill) प्रसिद्ध केलेली आहेत. त्या दिनांकास ग्राह्य धरून कर देयके बजावण्यात येत आहे. त्यामुळे सर्व मालमत्ता धारक/भोगवट्यातील इमारतीची व भुखंडाचे मागणी देयके (Bill) निम्नलिखित संकेतस्थळावर पाहू शकता व आपले बिल जतन (Download) करून कर भरणा करू शकता.

| | |
|---|---|
| ई-मेल | pmc.tax2016@gmail.com |
| संकेतस्थळ | www.panvelmc.org |
| मोबाईल APP (Google Playstore) | PMC TAX |

१. मुख्य कार्यालय - महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारत पनवेल महानगरपालिका देवाळे तलावाजवळ पनवेल.
२. खारघर कार्यालय - 'प्रभाग समिती अ' सेक्टर १३ प्राथमिक शाळेजवळ पूर्वाश्रमीचे ग्रामपंचायत कार्यालय खारघर पनवेल.
३. नावडे कार्यालय- 'प्रभाग समिती अ 'उपविभागीय कार्यालय, नावडे हायवे, नावडे गाव पनवेल.
४. कळंबोली कार्यालय - 'प्रभाग समिती ब' कार्यालय सेक्टर १E काळभैरव समाज मंगल कार्यालय जवळ पनवेल.
५. कामोठे कार्यालय - 'प्रभाग समिती क' कराडी समाज हॉल जवळ सेक्टर १४ कामोठे पनवेल.
६. प्रभाग समिती ड - 'प्रभाग समिती ड' कार्यालय विलासराव देशमुख कॉम्प्लेक्स शिवाजी चौक पनवेल.

संपर्क अधिकारी :-
१) सुनिल मानकामे (सहा-आयुक्त-मालमत्ता कर विभाग)
टोल फ्री.क्र :- १८००-५३२०-३४०
फोन नं.:- ०२२-२७४५८०४०/४१/४२

सही/-
(गणेश शेटे)
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका



## नमुना एन. डी.
(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/CC/Auto/2019/5306 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 BD8441 चे मालक **संदीप रामभाऊ मुंडकर** यांचे दि. २/४/२०२२ रोजी निधन झालेले आहे.

मी, सीमा संदीप मुंडकर पत्ता - मराठी शाळेजवळ, वाघिवली, पारगाव, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०६ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेल महानगरच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - सीमा संदीप मुंडकर**
**पत्ता - मराठी शाळेजवळ, वाघिवली, पारगाव, रायगड, महाराष्ट्र - ४१०२०६**

# नवी मुंबईत एचडी आजाराबाबत जागरूकता

**नवी मुंबई : बातमीदार**

आंतरराष्ट्रीय स्तरावर मे महिना हा एचडी (हंटिंग्टन डिसीज) जागरुकता महिना म्हणून पाळण्यात येतो. यामध्ये एचडी लाईट नावाचा महत्त्वाचा कार्यक्रम समाविष्ट आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या मार्गदर्शनानुसार आयकॉनिक वास्तू म्हणून सुपरिचीत असणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालय इमारतीस निळ्या आणि जांभळ्या रंगाची विद्युत रोषणाई करण्यात आलेली आहे. या माध्यमातून एचडी आजाराने ग्रस्त व्यक्तींच्या व त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी नवी मुंबईकर नागरिक ठामपणाने उभे आहेत, अशा प्रकारचा विश्वास अभिव्यक्त केला जात आहे.

## पालिकेच्या मुख्यालयास रोषणाई




एचडीबाधित कुटुंबासोबत आपले ऐक्य दर्शविण्यासाठी आणि डॉक्टर, सामान्य जनता व धोरणकर्त्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी शहरातील प्रमुख इमारतींवर एचडी साठी निश्चित करण्यात आलेली विशिष्ट प्रकारची निळ्या व जांभळ्या रंगाची रोषणाई करण्यात येते. एचडी कुटुंबातील सदस्य, हितचिंतक आणि तज्ज्ञांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे आणि एचडी बाधीत रोग्यांसाठी कायम निदान आणि अधिक जोमाने आजारांशी लढण्याची आशा बळकट करावी यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे.

हंटिंग्टन हजार ही मेंदूवर परिणाम करणारी असाध्य अनुवांशिक स्थिती आहे. रुग्णाचे शारीरिक हालचालींवर नियंत्रण नसणे, व्यक्तिमत्त्वात सामान्य नसणारे बदल तसेच अपुरी आकलनशक्ती क्षमता अशा प्रकारची लक्षणे हंटिंग्टन आजारात आढळतात. या आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांना मदत करण्यासाठी हंटिंग्टन डिसीज सोसायटी ऑफ इंडिया (HDS) संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.



# पावसाळापूर्व कामांची पाहणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

**गुणवत्तेकडेही बारकाईने लक्ष**

***आयुक्तांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्वच विभागातील मान्सूनपूर्व कामांना वेग आला असून ८० टक्क्याहून अधिक साफसफाई कामे पूर्ण झालेली आहेत. पावसाळी कालावधीत नागरिकांची अडचण होऊ नये याकरिता आधीच सतर्कता राखत महापालिका आयुक्त अभिजित बांगर मान्सूनपूर्व कामांची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करीत आहेत. त्यामुळे कामांना गतीमानता देतानाच त्याच्या गुणवत्तेकडेही बारकाईने लक्ष दिले जात आहे.***

या वर्षी मान्सुनचे आगमन दरवर्षीपेक्षा लवकर होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला असून पावसाळापूर्व नाले, बंदिस्त गटारे, मलनि:स्सारण वाहिन्या सफाई कामांना वेग देण्याचे निर्देश नवी मुंबई महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी आढावा बैठकीत दिले होते. त्या अनुषंगाने सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष जागी जाऊन पाहणी करण्यात येत असून दिघा व ऐरोली विभागानंतर आयुक्तांनी कोपरखैरणे व घणसोली विभागातील पावसाळापूर्व कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

कोपरखैरणे सेक्टर १० येथील आकाराने मोठ्या नाल्याच्या सफाईची पाहणी करताना आयुक्तांनी नाला आकाराने लहान असो वा मोठा, त्याच्या प्रवाहात कोणत्याही प्रकारचा अडथळा येऊन पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घेऊन नाले सफाईची कामे करावीत असे निर्देश दिले. सेक्टर ९ येथील होल्डींग पाँडच्या काठाशी खाडीचे पाणी भरती-ओहोटीनुसार आत-बाहेर येण्यासाठी करण्यात आलेल्या फ्लॅपगेट्सच्या कामाची पाहणी करीत शहरातील सर्व फ्लॅपगेट्स योग्य रितीने कार्यान्वित राहतील याची दक्षता घेण्याचे आयुक्तांनी निर्देशित केले.

नाले, गटारे, मलनि:स्सारण वाहिन्या यांच्या सफाईची कामे आत्ताच काटेकोरपणे करावीत असे स्पष्ट निर्देश देत सफाई व्यवस्थित न झाल्यामुळे पावसाळी कालावधीत पाणी साचण्याची घटना घडल्यास जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट संकेत आयुक्तांनी दिले.

कोपरखैरणे रेल्वे स्टेशन जवळील रुळांखालून ठाणे बेलापूरकडे जाणाऱ्या भूयारी मार्गाची आयुक्तांनी पाहणी केली. त्याठिकाणी सखल भाग असल्यामुळे पावसाळी कालावधीत भरतीच्या वेळीच अतिवृष्टी असल्यास या भूयारी मार्गात पाणी साचते. ते उपसण्यासाठी पंपांची व्यवस्था करण्यात आलेली असून सदर पंप व्यवस्थित सुरु राहतील व त्यामध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास त्याठिकाणी पर्यायी पंपांची व्यवस्था ठेवण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

कोपरखैरणे व घणसोली विभागातील विविध ठिकाणच्या नाल्यांची तसेच भूयारी गटारांची व मलनि:स्सारण वाहिन्यांची पाहणी करताना कंत्राटदारामार्फत करण्यात आलेल्या साफसफाई कामांची पडताळणी करण्याची कार्यप्रणाली करावी व त्याची पाहणी करताना आपल्या पर्यवेक्षण यंत्रणेने काटेकोरपणे तपासणी करावी असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

रबाळे एमआयडीसी भागात निब्बान टेकडी उतरल्यानंतर सखल भागात मागील वर्षी रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे लोकांना झालेला त्रास दूर करण्यासाठी व या वेळी पाणी साचू नये म्हणून महापालिका अभियांत्रिकी विभागामार्फत तेथील कच्च्या गटारांची अधिक काटेकोर सफाई करण्यात आलेली असून मुख्य रस्त्याच्या कडेने भूयारी गटारांचे कामही करण्यात आलेले आहे. या कामाची पाहणी करताना आयुक्तांनी तेथील साफसफाईकडे अधिक काटेकोर लक्ष देण्याच्या सूचना केल्या.

## निवडक



### कारागृहात नेत्र तपासणी शिबिर

**मोहोपाडा :** समता फाउंडेशन व जिल्हा मध्यवर्ती कारागृह अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. १८)मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिर झाले. या शिबिरात डोळ्यांची तपासणी करून कारागृहातील बंदिजणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराची सुरुवात कारागृह अधीक्षक नागेश सावंत यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या वेळी रसायनीतील माजी सरपंच संदिप मुंढे, पत्रकार राकेश खराडे उपस्थित होते. शिबिरात बंद्यांची नेत्र तपासणी करून डोळ्यांचा आजार असणाऱ्यांना मोफत औषध व चष्मे वाटप करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी कारागृह पोलीस विभागाने अथक परिश्रम घेतले.

### मोरबे येथून महिला बेपत्ता

**पनवेल :** करंबेळी-मोरबे येथील ३० वर्षीय महिला घरात कोणाला काहीही न सांगता कपड्याची बॅग घेऊन निघून गेली आहे. त्यामुळे ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सुकरी अर्जुन पारधी या महिलेची उंची दीडशे सेमी, रंग निमगोरा, चेहरा उभट आहे. तिने अंगात गुलाबी साडी, ब्लाउज, गळ्यात मंगळसूत्र, हातात हिरव्या बांगड्या घातल्या आहेत. तिच्या हातावर सुकरी अर्जुन पारधी असे गोंदविलेले आहे. या महिलेबाबत अधिक माहिती असल्यास तालुका पोलीस ठाण्याचे संजय दोरगे ८१०८१६७१०४ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आजपासून तांदूळ व आंबा महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान -उमेदच्या राज्यभरातील स्वयंसहाय्यता गटांच्या शेतातील उत्पादनाच्या आधारित तांदूळ आणि आंबा महोत्सव २०, २१ आणि २२ मे रोजी पुणे विद्यार्थी गृहचे विद्याभवन शैक्षणिक संकुल (सेक्टर-१८, नेरूळ) येथे आयोजित केला आहे.

राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यातून ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता गटाच्या महिलांच्या शेतातील तांदुळाच्याच्या विविध जाती, सेंद्रिय पद्धतीने पिकविलेला हापूस, केशर, पायरी इत्यादी प्रकारचा आंबा या महोत्सवात उपलब्ध असेल. या महोत्सवामध्ये इंद्रायणी हातसडीचा, इंद्रायणी पॉलिश, दप्तरी, जय श्रीराम, सेंद्रिय ब्लॅक, वाईसार, खुशबू, चिमण साळ, भवाळ्या जिरेसाल या प्रकारच्या जातींचा तांदूळ या महोत्सवामध्ये प्रदर्शन आणि विक्रीसाठी उपलब्ध असणार आहे. त्याचसोबत अवळाची उत्पादने, विविधप्रकारचे पापड, विविध मसाले, रोस्टेड गहू, नाचणी चे खाद्य पदार्थ, बांबूपासून तयार केलेल्या कलाकृती यासारख्या अनेक गोष्टी या महोत्सवात प्रदर्शन आणि विक्रीसाठी उपलब्ध असणार आहेत.

या महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २०) सकाळी १२ वाजता अभियानाचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी परमेश्वर राऊत, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयचे कोकण विभागाचे उपसंचालक गणेश मुळे, पुणे विद्यार्थी गृहचे संचालक दिनेश मिसाळ, स्माइल फाउंडेशनच्या उमा धीरज आहुजा आदी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

नवी मुंबई आणि पनवेल परिसरातील नागरिकांनी या महोत्सवाला उपस्थिती देऊन दर्जेदार व शुद्ध उत्पादने खरेदी करून ग्रामीण महिलांच्या स्वावलंबनाला हातभार लावण्याचे आवाहन अभियानाच्या उपसंचालक शीतल कदम यांनी केले आहे.

# 'समाजभूषण'ला तापी पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई निवासी तसेच कोकण विभागाचे माजी माहिती संचालक व साहित्यिक देवेंद्र भुजबळ व सहलेखिका रश्मी हेडे यांच्या समाजभूषण पुस्तकास राज्यस्तरीय तापी साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे. ५ जून रोजी गोव्यात होणाऱ्या अखिल भारतीय शिव साहित्य संमेलनात देण्यात येणार आहे.

या व्यतिरिक्त समाजभूषण पुस्तकास नुकताच शब्दप्रतिभा साहित्य रत्न पुरस्कादेखील प्राप्त झाला आहे. या दूहेरी यशाबद्दल देवेंद्र भुजबळ व रश्मी हेडे यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. ज्या व्यक्ती शिकतील, नवे काही करण्याचे धाडस करतील. त्या नक्कीच यशस्वी होतील, असा यशाचा मूलमंत्र सांगणारे हे समाजभूषण पुस्तक मुंबई येथील प्रसिद्ध भरारी प्रकाशनाने प्रकाशित केले आहे. या पुस्तकाचे अनेक मान्यवरांच्या हस्ते विभागीय प्रकाशन समारंभ झाले. या पुस्तकाला उदंड प्रतिसाद लाभत असून १ हजार प्रतींची पहिली आवृत्ती संपत आली आहे.

पुस्तकात कासार समाजातील ३५ स्त्री पुरुषांच्या यशोगाथा आहेत. प्रत्येकाची यशाची वाटचाल जरी वेगळी असली तरी त्यांच्यातील कष्ट करण्याची तयारी, जिद्द, चिकाटी, प्रयत्नवादी व सकारात्मक विचारसरणी, अभ्यासू, धाडसी वृत्ती हे गुण समान आहेत. प्रत्येक परिस्थितीचा सामना केला तर यश निश्चितच प्राप्त होते हे या पुस्तकात अतिशय सुंदर व सोप्या शब्दात मांडले आहे.

# वडिलांने केला मुलीवर अत्याचार, गुन्हा दाखल

**नवी मुंबई :** नेरूळ परिसरात एका वडिलांने आपल्या १६ वर्षांच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे प्रकरण उघडकीस आले. या प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीचे नाव अशोक चौधरी असून तो फरार झाला आहे, पोलीस त्यांच्या शोध घेत आहे.

सविस्तर वृत्त असे की, अशोक चौधरी हा मूळचा झारखंडचा रहिवासी असून नेरूळमध्ये एका ठिकाणी स्वयंपाकी म्हणून काम करीत होता, त्याला तीन मुले असून मागील वर्षी त्याने त्यांचा अल्पवयीन मुलीला मुंबईत घेवून आला. सोबत राहत असताना त्याने स्वतःच्या मुलीवर लैंगिक अत्याचार केला. हा प्रकार मुलीने तिचे वडील काम करीत असलेल्या घर मालकीनीला सांगितला. पोलिसांनी चौकशी करून तिच्या वडिलांच्या विरोधात पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे, फरार आरोपींचा शोध पोलीस घेत आहे.

# उरणमध्ये कवी संमेलन उत्साहात

**उरण : बातमीदार**

उरणमध्ये प्रत्येक महिन्याच्या १७ तारखेला उरण शहरातील विमला तलाव (गार्डन) येथे कोकण मराठी साहित्य परिषद व मधुबन कट्ट्याचे कविसंमेलन मोठ्या उत्साहात होत असते. हे कवी संमेलन ज्येष्ठ नागरिकांसाठी पर्वणीच असते. या वेळी मंगळवारी (दि. १७) विमला तलाव येथील गार्डन मधील कवी संमेलनात ज्येष्ठ नागरिक कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळाराम पाटील यांनी विचार मांडले.

कविसंमेलन आणि जीवनगौरव असे दोन कार्यक्रम घेण्यात आले. जीवन थळी आणि मारुती तांबे यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन रंजना केणी यांनी केले. हे ७९वे कविसंमेलन अत्यंत उत्साहात झाले.



या कविसंमेलनात रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील, किशोर म्हात्रे, मच्छिंद्र म्हात्रे, भगवान पोसू, संग्राम तोगरे, अरुण म्हात्रे, वसंत राऊत, अमोल पाटील आदींचे कविता वाचन झाले. या वेळी संजय केणी, सूर्यकांत दांडेकर, चंद्रकांत मुकादम, अनंत पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.



# संकष्ट चतुर्थीनिमित्त गणेशभक्त दर्शनासाठी पहाटेपासून रांगेत

**उरण : वार्ताहर**

संकष्ट चतुर्थी गुरुवारी (दि. १९) असल्याने उरण शहर सह तालुक्यातील सर्व गणपती मंदिरात भक्तांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या मंदिरासमोर दुर्वा, हार, नारळ, फुले यांची दुकाने थाटण्यात आली होती. भक्तांनी पहाटेपासूनच रांगेत उभे राहुन दर्शन घेतले.

उरण शहरातील गणपती चौक येथील श्री गणपती देवस्थान महा मंदिरात भक्तांनीदर्शनासाठी गर्दी केली होती. सकाळी ७.३० वाजता आरती करण्यात आली तर रात्री ९ वाजता महाआरती करण्यात आली, असे महा गणपती मंदिराचे विश्वस्त यांनी सांगितले.

उरण तालुक्यातील चिरनेर, उरण शहरातील गणपती चौक येथील गणपती मंदिर, विनायक येथील रिद्धी-सिद्धी विनायक, नागाव येथील गणेश मंदिर, मोरा येथील गणेश मंदिर, बोकडवीरा येथील गणेश मंदिर, सोनारी, गणपती चौक उरण येथील गणेश मंदिर आदी ठिकाणी गणेश भक्तगण दर्शन घेत असल्याचे चित्र दिसत होते.

# कोलकाता, बिहारच्या 'लिची'चा गोडवा नवी मुंबईकर चाखणार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोलकाता आणि बिहारच्या लिचीचा गोडवा आता नवी मुंबईकरांना चाखायला मिळणार आहे. कारण नवी मुंबई एपीएमसी मार्केटमध्ये लिचीची आवक सुरू झाली आहे.

वाशीतील फळबाजारात ५ ते ९ हजार किलो इतकी लिचीची आवक झाली आहे. दहा किलोच्या लिचीच्या एका पेटीला १५०० ते २ हजारांपर्यंत भाव मिळतोय. त्वचा सुंदर बनवण्यास मदत करणाऱ्या आणि वजन घटवणाऱ्या लिचीची मागणी वाढू लागली आहे. एकुणच येत्या काळात लिचीची आवक वाढल्यास लिचीचा दर कमी होण्याची शक्यता आहे.



# जेएनपीएचा नैसर्गिक संसाधने सुशोभिकरणासाठी पुढाकार

## साडेतेरा कोटीच्या खर्चाच्या योजनेच्या कामाला सुरुवात

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जेएनपीएने बंदर परिसरातील नैसर्गिक जलकुंभ, पाणवठे, व तलावांतील गाळ काढून पुनरुज्जीवित करून ते सुशोभित करण्याची योजना आखली आहे. जेएनपीए व प्रशासन भवन परिसरात कामानिमित्ताने दररोज येणाऱ्या देशी-विदेशी प्रवासी, वाटसरू, नागरिकांसाठी हे ब्युटी स्पॉट आकर्षण ठरणार आहेत. सुमारे साडेतेरा कोटीच्या खर्चाच्या योजनेच्या कामाला जेएनपीएने सुरुवातही केली आहे. त्यामुळे हे पाचही ब्युटीस्पॉट मे २०२३ पर्यंत पुर्णत्वास जाणार असुन जेएनपीए परिसराच्या सौंदर्यात आणखीनच भर घालण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत, अशी माहिती जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी दिली आहे.



जेएनपीटी बंदर क्षेत्रातील विविध नैसर्गिक निर्मित हरित प्रकल्पांना प्रोत्साहन, पुनरुज्जीवित करण्याच्या सूचना बंदर क्षेत्रातील हरित बंदर, शिपिंग आणि जलमार्ग मंत्रालयाने जेएनपीए प्रशासनाला दिल्या आहेत.

ग्रीन पोर्ट उपक्रमाच्या दृष्टीने सध्याच्या प्रस्तावावर विचार करण्यात आल्यानंतर प्रशासन भवनाच्या खालच्या बाजूला तसेच जुने शेवा गावच्या पायथ्याशी असलेले, शिव मंदिराजवळ आणि सीसीपी प्लाझा शेजारी असलेल्या पाच नैसर्गिक जलकुंभ, पाणवठे, तलावांचे सुशोभीकरण करण्याची योजना आखण्यात आली आहे. या योजनेसाठी १३ कोटी ११ लाख ७० हजार ६२५ रुपये खर्च अपेक्षित आहे. निधीच्या तरतुदीनंतर जेएनपीएने या योजनेच्या कामाला सुरुवातही केली आहे. १८ महिन्याच्या मुदतीचे काम मे २०२३ अखेर पुर्णत्वास जाणार असल्याचे जेएनपीएचे उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी सांगितले.

नैसर्गिक जलकुंभ, पाणवठे, व तलावांतील गाळ काढून पुनरुज्जीवित झाल्यानंतर अभ्यागत, स्थानिक तसेच तेथील रहिवाशांसाठी सौंदर्यदृष्ट्या डिझाइन केलेली जागा ब्युटीस्पॉट जेएनपीए व प्रशासन भवन परिसरात कामानिमित्ताने दररोज येणाऱ्या देशी-विदेशी प्रवासी, वाटसरू, नागरिकांनाच नव्हे तर येथील रहिवाशांनाही एक आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे.

या प्रकल्पामुळे हा परिसर वनस्पती आणि जीवजंतूंच्या निरोगी वाढीसह एक चांगले ठिकाण बनणार आहे. तसेच जैवविविधता वाढीलाही हातभार लागणार आहे, तसेच येथील रहिवासी पर्यटकांसाठी एक चांगले पर्यावरणीय स्थळ उदयास येईल असा विश्वासही उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी व्यक्त केला आहे.

डासांचा धोका, अत्याधिक अल्गल वाढीमुळे युट्रोफिकेशन समस्या आणि आक्रमक प्रजातींचे वर्चस्व यांसारख्या साचलेल्या पाण्याशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठीही अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे.

# ओबीसी मंत्र्यांनो, आता तरी लाचारी सोडा, समाजासाठी हिंमत दाखवा -अ‍ॅड. महेश मोहिते

**अलिबाग : प्रतिनिधी**

महविकास आघाडी सरकारच्या बेफिकीरीमुळे ओबीसी राजकीय आरक्षण राज्यात गमावले व ते पुन्हा मिळत नाही. राज्य सरकारमधील ओबीसी मंत्र्यांनी आता तरी लाचारी सोडावी आणि ओबीसींना राजकीय आरक्षण मिळण्यासाठी मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची हिमंत दाखवावी, असे आव्हान भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. महेश मोहिते यांनी दिले आहे.

भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. महेश मोहिते म्हणाले की, ओबीसींना राजकीय आरक्षण देताना ते किती प्रमाणात द्यावे, हा प्रश्न आहे व त्यासाठी समर्पित आयोगामार्फत इम्पिरिकल डेटा अर्थात ओबीसींची वस्तूस्थितीनुसार आकडेवारी गोळा करून प्रमाण ठरविणे आणि एकूण आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादेत ठेवणे गरजेचे आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ४ मार्च २०२१ रोजी महाराष्ट्रातील ओबीसी राजकीय आरक्षण स्थगित करतानाच ते पुन्हा लागू करण्यासाठी ही तिहेरी चाचणी पूर्ण करण्यास सांगितले होते. महाविकास आघाडी सरकारने नेमके हेच काम केले नसल्याने राज्यातील ओबीसी राजकीय आरक्षण पुन्हा लागू होत नाही. दुसरीकडे मध्य प्रदेशने न्यायालयाच्या आदेशानंतर ताबडतोब इम्पिरिकल डेटा गोळा करून चाचणी पूर्ण केली व ओबीसी आरक्षण पुन्हा मिळवले. मध्य प्रदेशमधील भाजप सरकारच्या यशानंतर महाविकास आघाडी सरकारचे अपयश पुन्हा स्पष्ट झाले आहे, असे अ‍ॅड. महेश मोहिते म्हणाले.

इम्पिरिकल डेटा गोळा करून तिहेरी चाचणी पूर्ण केली की, ओबीसी राजकीय आरक्षण परत मिळणार हे सर्वोच्च न्यायालयाने ४ मार्च २०२१ निकालापासूनच स्पष्ट होते. परंतु आता मध्य प्रदेशचा निकाल आल्यावर नवा शोध लागल्यासारखे महाविकास आघाडी सरकारचे मंत्री महाराष्ट्रालाही आपोआप आरक्षण मिळेल अशी दिशाभूल करीत आहेत. महाविकास आघाडीने एंपिरिकल डेटा गोळा करण्यात अक्षम्य टाळाटाळ केल्यामुळेच ओबीसींना परत आरक्षण मिळत नाही. या अपयशाची जबाबदारी महाविकास आघाडी सरकारमधील ओबीसी मंत्र्यांचीही आहे. या सरकारमधील ओबीसी मंत्र्यांनी आता तरी सत्तेची लाचारी सोडावी आणि सरकारवर दबाव आणण्यासाठी मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची हिमंत दाखवावी, असे अ‍ॅड. मोहिते म्हणाले.

## माणगावजवळ आढळला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोर्बा गावाच्या हद्दीत बुधवारी (दि. १८) एका ३८ ते ४२ वयोगटातील अज्ञात इसमाचा मृतदेह सडलेल्या अवस्थेत सापडल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

माणगावजवळील मोर्बा गावाच्या हद्दीत अज्ञात पुरुष जातीचा इसमाचा सडलेल्या अवस्थेत मृतदेह सापडला. त्याच्या अंगात नेसूस आकाशी व काळ्या रंगाचा स्पोर्ट हाफ टीशर्ट, काळ्या रंगाची साधी फुलपँट, कमरेला नारंगी रंगाचा दोरा पँटला बांधलेला असे आहे. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास माणगाव पोलीस ठाणे (दूरध्वनी क्र.०२१४०-२६३००५) किंवा तापसीक अधिकारी पोलीस उपनिरीक्षक गायकवाड (मो.नं. ९३०७३५१२८९) येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली आहे. अधिक तपास उपनिरीक्षक श्री. गायकवाड करीत आहेत.

## मोर्बा येथील कोकण हॉस्पिटलला मिळणार नवसंजीवनी; कार्डियाक रुग्णवाहिकेचे लोकार्पण

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोर्बा येथील बंद असलेले कोकण हॉस्पिटल जेएसबीआर ग्रुप बशीर हजवाने फाउंडेशनकडे हस्तांतरीत करण्यात आले असून, फाउंडेशनने या रुग्णालयाला दिलेल्या कार्डियाक रुग्णवाहिकेचे मंगळवारी (दि. १७) सायंकाळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष बशीर हजवाने यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले. येत्या सहा महिन्यात हे हॉस्पिटल रुग्णांच्या सेवेसाठी चांगल्या प्रकारे सज्ज होईल, अशी ग्वाही बशीर हजवाने यांनी या वेळी दिली.

मोर्बा मेडिकल सोसायटीने १९९४ मध्ये सुरु केलेले कोकण हॉस्पिटल काही अडचणी निर्माण झाल्याने बंद झाले होते. सामाजिक कार्यकर्ते रहिमतुल्लाह उर्फ राजा राऊत यांच्या प्रयत्नांने जेएसबीआर ग्रुप बशीर हजवाने फाउंडेशनकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे. यानंतर फाउंडेशनने या रुग्णालयाला कार्डियाक वातानुकूलित रुग्णवाहिका भेट दिली. रुग्णवाहिकेचे मंगळवारी लोकार्पण करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ नेते अलीशेठ कौचाली, अस्लमभाई राऊत, अब्दल्ला गंगरेकर, मोर्बा मेडिकल सोसायटीचे अध्यक्ष महम्मदसाले राऊत, याकूब चिलवान, इस्माईल धनसे, डॉ. आयुब ढोकळे, डॉ. अबू राऊत, डॉ. अन्वर खान, लतीफ बंदरकर, सुलेमान म्हैसकर, अल्ताफ धनसे, मोहसीन राऊत, इकबाल हर्णेकर, हनीफ राऊत, मौलाना सरफराज जालगावकर, अकबर ताज, शौकत रोहेकर, नुरुद्दीन जालगावकर, अब्दल्ला जालगावर, अजीज गंगरेकर आदींसह मोर्बा परिसरातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हजवाने फाउंडेशकडून या रुग्णालयाला लागेल ते सहकार्य केले जाईल, असे आश्वासन बशीर हजवाने यांनी या वेळी दिले. मौलाना अशफाक, मोर्बा मेडिकल सोसायटीचे सचिव डॉ. मैनुद्दीन राऊत यांनीही मनोगत व्यक्त केले. ज्येष्ठ नेते इकबाल धनसे यांनी आभार मानले.




(छाया : सलीम शेख)

## इंदापूर येथे तीन वाहनांमध्ये अपघात

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर इंदापूर (ता. माणगाव) बसस्थानक परिसरात एर्टिगा कार, टँकर व इनोव्हा कार या तीन वाहनांमध्ये बुधवारी (दि. १८) सकाळी अपघात झाला. त्यात एक जण जखमी झाला असून तिन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.



फिर्यादी बाबुलाल नारायण पवार (वय ५८, रा. बोईसर, जि. पालघर) हे त्यांच्या ताब्यातील एर्टिगा कार (एमएच-४८,सीसी-७३१९) घेऊन मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाने बोईसर येथे जात होते. इंदापूर बसस्थानकाजवळ समोरून भरधाव वेगात आलेल्या टँकर (एमएच-४६,एएफ-३१०६) ने एर्टिगा कारला ठोकर दिली. त्यामुळे एर्टिगा कार रस्त्यावर गोल फिरून मुंबईबाजूकडून गोव्याकडे जाणाऱ्या इनोव्हा कार (एमएच-४३,एबी-३४८८) वर आदळली. या अपघातात बाबुलाल पवार जखमी झाले व तिन्ही वाहनांचे नुकसान झाले. अपघात झाल्यानंतर टँकर चालक घटनास्थळावरून पळून गेला.

या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील करीत आहेत.

## उल्हास नदीच्या खोऱ्यातील उष्णतेचे वाढते प्रमाण कमी करण्यासाठी विचारमंथन सुरू

### उल्हास खोरे संजीवनी अभियान आणि अश्वमेघ प्रतिष्ठानकडून नियोजन सुरू



**कर्जत : बातमीदार**

उल्हास नदी खोऱ्यातील उष्णतेचे प्रमाण खाली आणण्यासाठी उल्हास नदी खोरे संजीवनी अभियान आणि अश्वमेघ प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून नेरळ येथील सगुणाबाग या कृषी पर्यटन केंद्रात विचारमंथन सुरु झाले आहे. त्यात वातावरणातील उष्णतेचे प्रमाण कमी करण्यासाठी काम करणारे तज्ज्ञ सहभागी झाले आहेत.

उल्हास नदी पुणे, रायगड व ठाणे या जिल्ह्यांमधून वाहते व वसईच्या खाडीला जाऊन मिळते. या तीन जिल्ह्यांमध्ये असलेले उल्हास नदीचे खोरे अंदाजे चार हजार चौरस किमी आहे. ५० लाखापेक्षा जास्त नागरिक उल्हास नदीचे पाणी पिण्यासाठी आणि शेतीसाठी वापरले जाते. त्यामुळे हा जलस्त्रोत सातत्याने व शाश्वतपणे वाहत राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या जलस्त्रोता भोवतालचा परिसर नैसर्गिक दृष्ट्या वैविध्यपूर्ण व सशक्त असणे अत्यावश्यक आहे. उल्हास खोऱ्यातील उष्णतेचे प्रमाण खाली आणण्यासाठी सगुणा रूरल फाउंडेशन, उल्हास नदी खोरे संजीवनी अभियान आणि ठाणे जिल्ह्यातील अश्वमेध प्रतिष्ठान यांनी काम सुरु केले आहे. त्यासाठी नेरळ जवळील सगुणाबाग येथे पहिले चर्चासत्र आणि विचारमंथन झाले. त्यात कृषिरत्न शेतकरी शेखर भडसावळे, हैद्राबाद संशोधक डॉ. राजे, वन्य जीव अभ्यासक कौस्तुभ कुर्लेकर, पर्यावरण अभ्यासक समर्थ परब, अनिल निवळकर, जीवशास्त्र अभ्यासक प्रा. अनुराधा भडसावळे आणि एम इंडिकेटरचे निर्माते सचिन पेके आदी सहभागी झाले होते. त्यांनी दोन दिवस उल्हास नदीच्या खोऱ्यात उष्णतेचे प्रमाण खाली आणण्यासाठी काय करायला हवे? त्यासाठी शासनाची कशी मदत मिळवायची? यावर विचारमंथन केले. आगामी काळात दर पंधरा दिवसांनी एकत्र येऊन चर्चा करून या कामाला अंतिम स्वरूप देण्याचे निश्चित करण्यात आले.

## बोरगाव भवानीपाडामध्ये कृत्रिम पाणीटंचाई

**कर्जत : बातमीदार**

शासनाने खोदलेली कुपनलिका खासगी जागेत असल्याने आणि जागा मालक ग्रामस्थांना पाणी देत नसल्यामुळे कर्जत तालुक्यातील ओलमण ग्रामपंचायत हद्दीतील बोरगाव भवानीपाडामध्ये कृत्रीम पाणीटंचाई निर्माण झाली आहे. अन्य ठिकाणी जाऊन येथील ग्रामस्थांना पिण्याचे पाणी आणावे लागत आहे.



उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर बोरगाव-भवानीपाडा येथील ग्रामस्थ दरवर्षी उंबरखांड गावात तर कधी सुतारपाडा येथील फार्महाऊसमध्ये जाऊन पिण्याचे पाणी आणत असत. बोरगाव-भवानीपाडा ग्रामस्थांच्या मागणीनंतर कर्जत तालुका पंचायत समितीने कुपनलिका खोदली आणि त्यावर हातपंप लावून दिला. मात्र ही कुपनलिका एका खासगी व्यक्तीच्या जागेमध्ये खोदण्यात आली होती. काही दिवसांनी त्या कुपनलिकेवर खासगी व्यक्तीने आपला हक्क सांगितला आणि त्या जागेत येण्यास ग्रामस्थांना मज्जाव केला. त्यामुळे कुपनलिकेला भरपूर पाणी असूनदेखील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे.

भवानीपाडामधील ग्रामस्थ राकेश खडेकर यांनी कर्जत पंचायत समिती आणि तहसीलदार यांना या कुपनलिकेबाबत माहिती देऊन ग्रामस्थांची पाण्यासाठी सुरु असलेली वणवण थांबविण्याची मागणी केली आहे.

पाणीटंचाई काळात शासन खासगी पाण्याचे स्त्रोतदेखील ताब्यात घेत असते. मात्र भवानीपाडामध्ये शासनाने खर्च केलेल्या कुपनलिकेचे पाणी भरू दिले जात नसल्याने ग्रामस्थदेखील संतप्त झाले आहेत. शासनाने ही कुपनलिका ग्रामस्थांसाठी खुली करून द्यावी, अशी मागणी भवानीपाडा ग्रामस्थांनी केली आहे.

## मुरूडमध्ये सोलर वॉटर हिटर सेवा कार्यान्वित

**मुरूड : प्रतिनिधी**

पर्यटकांच्या सोयीसाठी मुरूड नगर परिषदेने उभारलेल्या सोलर वॉटर हिटरचे लोकार्पण माजी नगराध्यक्षा स्नेहा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. पर्यटकांसाठी उत्तम सुविधा देण्यास मुरूड जंजिरा नगर परिषद कटीबद्ध असल्याची ग्वाही या वेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी दिली.

शासनाच्या माझी वसुंधरा अभियान अंतर्गत मुरूड समुद्र किनाऱ्यावरील चेंजींग रुममध्ये नगर परिषदेतर्फे एक हजार लिटर क्षमतेचे सोलर वॉटर हिटर युनिट कार्यान्वित करण्यात आले आहे. त्यातून रोज सुमारे २०० पर्यटकांकरिता गरम पाणी उपलब्ध होणार आहे. या सोलार वॉटर हिटरच्या लोकार्पण सोहळ्याला नगर परिषद कार्यालयीन प्रशासकिय अधिकारी परेश कुंभार, सतेज निमकर, अशोक धुमाळ, संजय वेटकोळी, युगा ठाकूर, प्रशांत दिवेकर, सुदेश माळी, प्रकाश आरेकर, पांडुरंग आरेकर, कपिल वेहेले, बाळकृष्ण गोजी, राजू म्हशीलकर आदी उपस्थित होते.

मुरूड समुद्र किनारी वर्षाला पाच लाख पर्यटक भेट देत असतात. समुद्र किनारी पोहून झाल्यानंतर पर्यटकांना गरम अथवा थंड पाणी उपलब्ध करून देण्यासाठी नगर परिषदेने सोलर वॉटर हिटर सेवा कार्यान्वित केल्याने पर्यटकांनी समाधान व्यक्त केले आहे.





## रानमेवा माथेरान बाजारपेठेत दाखल

**कर्जत : बातमीदार**

माथेरान परिसरातील जंगलात मिळणारा रानमेवा आता बाजारात दिसू लागला आहे. आदिवासी बांधवांनी टोपलीमध्ये आणलेला हा रानमेवा विकत घेण्यासाठी स्थानिकांबरोबर पर्यटकदेखील माथेरानच्या बाजारात गर्दी करीत आहेत.

माथेरान हे सह्याद्री पर्वतरांगांच्या कुशीत वसलेले पर्यटक स्थळ आहे. माथेरान परिसरातील घनदाट जंगलात अनेक वनस्पती. फळे, फुले व औषधी वनस्पती आहेत. एप्रिल, मे या महिन्यांमध्ये या जंगलात करवंदे, जांभळे, कैऱ्या, आवळा, चिंच, आळू आदी फळे माथेरानच्या जंगलात आढळतात. हा रानमेवा गोळा करून आदिवासी बांधव तो विकण्यासाठी माथेरानच्या बाजारात येतात. जंगलात सापडणारा हा रानमेवा हौसेने व चविने खाण्याचा आनंद पर्यटक घेत असतात.

सध्या जंगलात सापडणारी करवंदे, जांभळे, कैऱ्या, आवळा, चिंच, आळू ही फळे माथेरानच्या बाजारात मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी येत असून ही स्वादिष्ट फळे खरेदी करून खाण्याचा आनंद पर्यटक घेत आहेत.



(छाया : संतोष पेरणे)

## श्री साई ट्रस्टकडून दिव्यांगाला व्हीलचेअर भेट



**कर्जत : बातमीदार**

नवी मुंबईतील श्री साई ट्रस्ट या संस्थेकडून कर्जत तालुक्यातील उमरोली येथील अपंग बालकाला व्हीलचेअर भेट देण्यात आली. वैभव चव्हाण हा पहिली इयत्तेत शिक्षण घेत असून त्याच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती नसल्याने उमरोली येथील जिल्हा परिषद शाळेच्या मागणीनुसार श्री साई ट्रस्टकडून ही मदत देण्यात आली.

वैभव चव्हाण हा विद्यार्थी अस्थिव्यंग असल्यामुळे शाळेपर्यंत ने-आण करणे त्यांच्या कुटुंबाला कठीण जात होते. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने व्हीलचेअर घेवू शकत नव्हते. त्यामुळे वैभवला शिक्षणापासून वंचित रहावे लागत होते. शाळेचे मुख्याध्यापक राजेश जाधव यांनी वैभव चव्हाण याच्यासाठी श्री साई ट्रस्टकडे व्हीलचेअरची मागणी केली. ट्रस्टचे कार्यकर्ते दिलीप घुले यांनी ट्रस्टकडे वैभव चव्हाण या विद्यार्थ्याबाबत माहिती पुरविली. त्यानंतर श्री साई ट्रस्टच्या संचालिका राधिका घुले यांच्या हस्ते वैभव चव्हाण या विद्यार्थ्याला व्हीलचेअर सुपूर्द करण्यात आली. या वेळी शाळेचे सर्व शिक्षक तसेच चव्हाण कुटुंबीय उपस्थित होते.

## मुरूड नांदगाव येथे ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन महोत्सव उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

आपली पुढील पिढी सुशिक्षित, सुसंस्कृत घडवायची असेल तर वारकरी संप्रदायाच्या सद्भक्तीकडे वळा, तिथे तुम्हाला ज्ञान, शांती आणि मुख्य म्हणजे समाधान मिळेल, असे प्रतिपादन डोंगरी मठाधीपती आध्यात्मिक गुरू त्रिशाताई पाटील यांनी मुरूड तालुक्यातील नांदगाव येथे केले.

मुरूड तालुका वारकरी संप्रदाय व आगरी समाजा तर्फे नांदगाव येथील लक्ष्मीनारायण मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. हभप भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज सावर्डेकर यांनी गणेश पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात केली. या कार्यक्रमाचे पहिले पुष्प त्रिशाताई पाटील यांनी गुंफले. त्यावेळी त्यांनी नामाचा जप करा, ज्ञानमय भक्ती करा असे आवाहन केले.

संत ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरू तुकोबाराय हे जमीनदार किंवा करोडोपती नव्हेत पण त्यांच्याकडे इतरांना देणारे ज्ञान होते. आजदेखील त्यांचे ग्रंथ, श्लोक मानवाला आदर्श बनवितात, असे त्रिशाताई पाटील यांनी सांगितले.

मुरूड वारकरी संप्रदाय अध्यक्ष सुनील मिठाग्री, आगरी समाज अध्यक्ष मनोहर मोकल, महिला अध्यक्ष आरती मोकल तसेच मंगेश पाटील, नरेश पाटील, अनंत पाटील यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. गुरूमाऊली त्रिशाताई पाटील यांच्या स्वामी परिवारातील अनेक सदस्य तसेच नांदगाव पंचक्रोशीतल ग्रामस्थ या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. योग साधनेच्या प्रात्यक्षिकांनी या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



(छाया : संजय करडे)

# लखनऊचा केकेआरवर निसटता विजय

## एव्हिन लुईसनचा झेल ठरला सामन्याचा टर्निंग पॉइंट

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२२च्या बुधवारी रात्री झालेल्या सामन्यात केएल राहुलच्या नेतृत्वाखालील लखनऊ सुपर जायंट्सने कोलकाता नाईट रायडर्सचा दोन धावांनी पराभव केला. या विजयासह लखनऊ सुपर जायंट्स प्लेऑफसाठी पात्र ठरणारा दुसरा संघ ठरला. लखनऊच्या या विजयात रिंकू सिंह संघासाठी अडसर ठरत होता, पण एव्हिन लुईसने आपल्या शानदार क्षेत्ररक्षणातून त्याला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला आणि कोलकाता नाईट रायडर्सवर निसटता विजय मिळविला. लखनऊ सुपर जायंट्सने प्रथम फलंदाजी करताना केकेआरसमोर २११ धावांचे लक्ष्य ठेवले होते, कोलकाताला निर्धारित २० षटकात २०८ धावाच करता आल्या.



कोलकाता नाईट रायडर्सला शेवटच्या षटकात २१ धावांची गरज होती. यादरम्यान चेंडू मार्कस स्टॉइनिसच्या हातात होता, तर रिंकू सिंह स्ट्राईकवर फलंदाजी करीत होता. स्टाइनिनच्या पहिल्या चेंडूवर रिंकूने चौकार मारला आणि पुढच्या दोन चेंडूंवर दोन षटकार ठोकले. रिंकूची ही झंझावाती फलंदाजी पाहिल्यानंतर लखनऊचे चाहते काही काळ थांबले.

पहिल्या तीन चेंडूत १६ धावा केल्यानंतर कोलकाताला शेवटच्या तीन चेंडूत पाच धावांची गरज होती. चौथ्या चेंडूवर रिंकू सिंह दोन धावा धावला. आता केकेआरला दोन चेंडूत तीन धावांची गरज होती आणि या मोसमातील सर्वात मोठ्या धावांचा पाठलाग पूर्ण करेल असे वाटत होते, पण नियतीच्या मनात काही वेगळेच असावे. पाचव्या चेंडूवर रिंकू सिंहला एक्स्ट्रा कव्हरवरून खेळायचे होते, पण त्याने चेंडू हवेत मारला. बॅकवर्ड पॉइंटच्या दिशेने उभ्या असलेल्या लुईसने पटकन चेंडूकडे धाव घेतली आणि विरुद्ध हाताने झेल घेतला. लुईसचा हा झेल पाहिल्यानंतर सर्वांनाच आश्चर्य वाटले आणि तो सामन्याचा टर्निंग पॉइंट ठरला.

लुईसच्या या दमदार झेलनंतर कोलकाता नाईट रायडर्सला शेवटच्या चेंडूवर तीन धावांची गरज होती. चौकार गेला असते तर कोलकाताने सामना जिंकला असता आणि दोन धावा झाल्या असत्या तर आयपीएल २०२२ची पहिली सुपर ओव्हर खेळली गेली असती. पण स्टॉइनिसने शेवटच्या चेंडूवर उमेश यादवला यॉर्करवर बोल्ड करून लखनऊ सुपर जायंट्सला दणका दिला.

लुईसचा नऊ मॅचनंतर लखनऊच्या संघामध्ये समावेश करण्यात आला होता, पण, क्विंटन डी कॉक आणि केएल राहुल या ओपनिंग जोडीने संपूर्ण २० षटके खेळल्याने इतरांना फलंदाजी करता आली नाही. यामुळे लुईसलाही बॅटींग मिळाली नाही. संपूर्ण सामन्यामध्ये फार संधी न मिळालेल्या लुईसने शेवटच्या ओव्हरमध्ये एक कॅच घेत सामन्याचे चित्र पालटले.

# नवी मुंबई पालिका क्रीडा संघाचे जिल्हास्तरीय कबड्डीत यश

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका कबड्डी संघाने ठाणे जिल्ह्यातील जुन्या व बलाढ्य संघांना पराभूत करीत उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला. उपांत्य फेरीतील अटीतटीच्या लढतीत छत्रपती क्रीडा मंडळ, डोंबिवली संघाने २५-२० अशा पाच गुण फरकाने नवी मुंबई महानगरपालिका संघावर विजय मिळविला. त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेचा संघ स्पर्धेत तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला. नवी मुंबई महानगरपालिका संघातील खेळाडू हे कुमार गटात खेळणारे खेळाडू असूनसुद्धा या स्पर्धेमध्ये वरिष्ठ अ गटात खेळून त्यांनी क्रीडाप्रेमींची मने जिंकली. महानगरपालिका संघातील खेळाडू अफ्ताब हसनेत मन्सुरी याने दिवसातील उत्कृष्ट चढाईपटू म्हणून तर २७ एप्रिल रोजीचा सर्वोत्कृष्ट संरक्षक म्हणून सुनील राठोड यांचा वैयक्तिक पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला.

यामध्ये महानगरपालिकेचे विविध खेळांतील संघ जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर उत्तम यश संपादन करीत असून नुकत्याच ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने, जयशंकर क्रीडा मंडळ कल्याण यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा प्रशिक्षण केंद्र अ गटाच्या संघाने तृतीय क्रमांक मिळवून स्वत:च्या कर्तबगारीची नाममुद्रा उमटविली. या संघातील खेळाडू दिपक केवट याची ५ ते ८ मे या कालावधीत पुणे येथे होणाऱ्या कुमार गट राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेकरिता ठाणे जिल्हा संघात निवड झालेली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या संघाने मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबद्दल महापालिका आयुक्त अभिजित बांगर व क्रीडा व सांस्कृतिक कार्य. विभागाचे उपायुक्त मनोजकुमार महाले यांनी संघाचे अभिनंदन करीत पुढील काळात आणखी चांगली कामगिरी करून अंतिम विजेतेपद मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा शुभेच्छा दिल्या. महानगरपालिकेचे क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव हे व्यवस्थापक असून रविंद्र सकपाळ यांच्या प्रशिक्षणाखाली संघाने हे उज्ज्वल यश संपादन केले.



# आरती केदारची महिला आयपीएलमध्ये निवड

**अहमदनगर : प्रतिनिधी**

बीसीसीआयने सोमवारी (दि. १६) महिला टी-२० चॅलेंज स्पर्धेसाठी टीमची घोषणा केली. महिला टी-२० चॅलेंज स्पर्धेसाठी प्रत्येक टीममध्ये १६ खेळाडू असणार आहेत. या स्पर्धेचे आयोजन



२३ ते २८ मे दरम्यान पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट स्टेडियममध्ये करण्यात आले आहे. महिला चॅलेंज स्पर्धेसाठी अहमदनगरच्या आरती केदार या तरुणीची निवड करण्यात आली आहे.

आरतीची बीसीसीआयकडून आयपीएल स्पर्धेतील व्हेलॉसिटी संघात निवड करण्यात आली आहे. आरतीच्या या निवडीचा पाथर्डीसह नगर जिल्ह्यातून कौतुक होत आहे. पाथर्डीसारख्या छोट्याशा गावात महिला क्रिकेटसाठी अनुकूल वातावरण नसताना आरतीने प्रतिकूल परिस्थितीत परिश्रम घेत हे यश मिळवले. आरती पाथर्डीच्या हातरळ गावातील पदवी शिक्षण घेतेय. आरती २०१४पासून क्रिकेटकडे वळली. तेव्हापासून आरतीने पाथर्डीत सराव करीत महाराष्ट्र टीममध्ये आपले स्थान निश्चित केले.

आरती लेफ्ट आर्म स्पिनर आहे. आरतीने नुकतेच पाँडिचेरीत झालेल्या महिला रणजी सामन्यात सर्वाधिक विकेट्स घेण्याची कामगिरी केली. आरतीने याच कामगिरीच्या जोरावर महिला आयपीएलमध्ये धडक मारली.

# कर्णबधीर बॅडमिंटनपटू अनिकाच्या 'सुवर्ण' कामगिरीने रचला इतिहास



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ब्राझीलमध्ये झालेल्या २४व्या कर्णबधीर ऑलिम्पिक स्पर्धेत भारताची कर्णबधीर बॅडमिंटनपटू जरलीन अनिकाने इतिहास रचत तीन सुवर्णपदकांची कमाई केली. अनिकाने महिला एकेरी, मिश्र दुहेरी आणि मिश्र सांघिक प्रकारात सुवर्ण कामगिरी केली.

अनिकाचे वडील जे जेयर रेचागेन यांनी सांगितले की, अनिकाला हार आवडत नाही. ज्यावेळी आम्ही ब्राझीलवरून परतत होतो त्यावेळी तिने मला विचारले की, लोक माझे अभिनंदन का करीत आहेत. मी सर्व चार सुवर्णपदके जिंकू शकले नाही.

अनिकाच्या वडिलांनी सांगितले की, तिने कोच पी. सरवनन यांच्या मार्गदर्शनाखाली मुराईमध्ये ८ वर्षापासून खेळण्यास सुरुवात केली. तेदेखील सामान्य मुलांसोबतच तिचा सराव घेत होते, मात्र त्यानंतर त्यांनी अनिकाशी संवाद साधण्यासाठी तिची भाषा शिकली. अनिकाच्या वडिलांना मदुराईच्या एखा जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्याकडून कर्णबधीर ऑलिम्पिकची माहिती मिळाली.

अनिकाने २०१७ मध्ये टर्कीमध्ये झालेल्या कर्णबधीर ऑलिम्पिकमध्ये भाग घेतला. त्यानंतर मलेशियामध्ये झालेल्या एशिया पॅसिफिक बॅडमिंटन स्पर्धेत २०१८ला दोन रौप्य आणि एक कांस्य पदक पटकावले होते. त्यानंतर एका वर्षाने चीनमध्ये जागतिक कर्णबधीर बॅडमिंटन स्पर्धेत एक सुवर्ण आणि दोन रौप्य आणि एक कांस्य पदक पटकावले होते.

# मुंबई इंडियन्सच्या अखेरच्या सामन्यात अर्जून खेळणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात बुधवारी (दि. १७) अतिशय रोमांचक असा समाना झाला. हैदराबादने सामन्यात मुंबईचा तीन धावांनी पराभव केला. प्लेऑफमधून बाहेर पडलेली मुंबई इंडियन्सने कालच्या सामन्यात नवीन खेळाडूंना संधी दिली. हैदराबाद विरुद्ध मुंबईचा संघ दोन युवा खेळाडूंसह मैदानात उतरला होता. पण त्यात अर्जुन तेंडुलकरला खेळवण्यात आले नाही. अर्जुन कधी पदार्पण करणार यांची सर्व चाहत्यांना प्रतीक्षा आहे.

## कॅप्टन रोहितने दिले संकेत

अर्जुन तेंडुलकर खेळणार की नाही, यावर कर्णधार रोहित शर्माने मोठे संकेत दिले आहेत. त्यामुळे दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात अर्जुन आपल्याला खेळताना दिसू शकतो. सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या नाणेफेक दरम्यान रोहित शर्मा म्हणाला की, आम्ही सतत नवीन खेळाडूंना संधी देणार आहे, ज्यामुळे पुढील हंगामासाठी आम्हाला काही गोष्टी स्पष्ट होतील. हैदराबाद विरुद्धच्या सामन्यात मयंक मार्कंडेय आणि संजय यादव यांना संधी दिले. असेच शेवटच्या सामन्यातही काही नवीन खेळाडूंना संधी दिली जाईल. मुंबई इंडियन्सचा शेवटचा सामना शनिवारी (दि. २१) दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध आहे. अर्जुन तेंडुलकर रोहितच्या या वक्तव्यानंतर ट्विटरवर ट्रेंड करू लागला. दिल्ली कॅपिटल्स विरुद्धच्या सामन्यात अर्जुन नक्की खेळणार असा अंदाज लावल्या जात आहे. मेगा लिलावात मुंबई इंडियन्सने अर्जुन तेंडुलकरला ३० लाख रुपयांना खरेदी केले होते.

मुंबई इंडियन्सने गेल्या हंगामातही अर्जुनला २० लाख रुपयांना खरेदी केले होते, पण त्याला एकही सामना खेळावला नव्हता आणि या हंगामातही तसेच घडले आहे. मुंबई इंडियन्सने मात्र अर्जुन तेंडुलकरचा फोटो सोशल मीडियावर अनेकदा पोस्ट केला आहे, असे संकेत मिळत आहेत.

# थायलंड खुली बॅडिमटन स्पर्धा : श्रीकांत, सिंधूची दुसऱ्या फेरीत धडक

**बँकॉक : वृत्तसंस्था**

भारताच्या ऐतिहासिक थॉमस चषक विजयात मोलाची भूमिका पार पाडणारा किदम्बी श्रीकांत आणि दोन ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधू यांनी थायलंड खुल्या बॅडमिटन स्पर्धेची दुसरी फेरी गाठली, परंतु सायना नेहवाल आणि एचएस प्रणॉय यांचे आव्हान संपुष्टात आले.



आठव्या मानांकित श्रीकांतने पहिल्या फेरीत फ्रान्सच्या ब्राइस लेव्हरडेजला १८-२१, २१-१०, २१-१६ असे नमवले. दुसऱ्या फेरीत त्याचा सामना पात्रता फेरीतून पुढे वाटचाल करणाऱ्या आयर्लंडच्या एनहाट एनगुएनशी होणार आहे.

महिला एकेरीत सहाव्या मानांकित सिंधूने अमेरिकेच्या लॉरेन लॅमवर २१-१९, १९-२१, २१-१८ असा विजय मिळवला. पुढच्या फेरीत तिची गाठ कोरियाच्या सिम यु जिनशी पडणार आहे. याच गटात मालविका बनसोडने युक्रेनच्या मारिया उल्टिनावर १७-२१, २१-१५, २१-११ असा विजय मिळवत आगेकूच केली. पुढील फेरीत तिचा सामना डेन्मार्कच्या लाइन ख्रिस्तोफरसेनशी होणार आहे.

पुरुष एकेरीत एचएस प्रणॉयचा मलेशियाच्या लिव डॅरेनकडून २१-१७, १५-२१, २१-१५ अशा फरकाने पराभव झाला. तर, महिला एकेरीच्या लढतीत लंडन ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या सायनाने पहिल्या फेरीत कोरियाच्या की किम गा युनकडून २१-११, १५-२१, १७-२१ असा पराभव पत्करला.





**पनवेल : तालुक्यातील पिसारवे येथे जय हनुमान तालिम संघ व स्व. रामचंद्र मढवी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने विविध गटातील कुस्ती स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी लहान कुस्तीगिरांनी प्रेक्षकांची मने जिंकली.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

# जय भवानीतर्फे एक दिवसीय शालेय कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

चिंचपोकळी-पूर्व येथील जय भवानी क्रीडामंडळ व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे समाजरत्न स्व. सुरेश आचरेकर स्मृती चषक शालेय प्रीमियर लीगमधील १५ वर्षाखालील शालेय मुलांची एक दिवसीय कबड्डी स्पर्धा शनिवारी (दि. २१) होणार आहे. राष्ट्रीय प्रशिक्षक व राष्ट्रीय कबड्डीपटू राणाप्रताप तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली निर्माण झालेले १५ वर्षाखालील शालेय मुलांचे जेबी सेव्हन, प्लॅटीनम आरएमएमएस, सिल्व्हर एमआरआरकेएस, आयडियल चॅम्प आदी संघामध्ये ही कबड्डी स्पर्धा स्व. सुरेश आचरेकर क्रीडांगणात रंगणार आहे. कबड्डी नियमांची उजळणी, वॉर्म अप आदीबाबत शालेय खेळाडूंना यानिमित्त मार्गदर्शन कबड्डी शिक्षक सुनील खोपकर, क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक व शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळी करीत आहेत.

सस्नेह निमंत्रण

।। श्री गणेशाय नम: ।। ।। श्री कुलदेवताय नम:।।
।। श्रीराम समर्थ ।।

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ। निर्विघ्नं कुरूमेदेव, सर्वकार्येषु सर्वदा।।

चि.सौ.कां.
**रोशनी**
सौ. दर्शना व श्री. भगवान बाळाराम भोईर मु. पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांची सुकन्या

चि.
**अलोक**
सौ. सारिका व श्री. सुरेंद्र शांताराम खिसमतराव मु. भिवंडी, ता. भिवंडी, जि. ठाणे यांचा सुपूत्र

यांचा
**साखरपुडा समारंभ**
शुक्रवार, दि. २०/०५/२०२२ रोजी सायं. ५ वा. ३० मि. या शुभमुहूर्तावर करण्याचे योजिले आहे.

स्थळ
**बार्न्स हायस्कूल**
एमसीसीएच सोसायटी, प्लॉट नं. १२, पनवेल, नवी मुंबई, महाराष्ट्र-४१०२०६

निमंत्रक
**समस्त भोईर व खिसमतराव परिवार**

हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अ‍ॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अ‍ॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**